# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. ATI/RNP/078/2018-2020

YEAR : 43) 17th October 2018 ( No. of Pages 12 ) ( No : 09


### *महासंघाच्या कार्यकारी मंडळाचा मूळ इतिवृत्तावरील ठराव*
### *(०६.१०.२०१८ रोजीच्या बैठकीत संमत केलेला)*

## *एकाही प्रश्नाच्या बाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा मला अधिकार नाही हे मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी लिखित स्वरूपात मान्य केलेले असल्यामुळे*

# *आंदोलन ठामपणे सुरू राहील*

### *मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपाशिवाय या परिस्थितीतून मार्ग निघणे अशक्य*

*महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाच्या वतीने तयार करण्यात आलेला हा अहवाल कार्यकारी मंडळाच्या शनिवार, दिनांक ०६.१०.२०१८ रोजीच्या बैठकीत विचारात घेण्यात आला व संमत करण्यात आला.*

### भाग : एक

विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षणक्षेत्रासमोर उभ्या असलेल्या अनेक प्रश्नांपैकी एकाही प्रश्नाच्या बाबतीत गेली अनेक वर्षे निर्णय होत नसल्यामुळे महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने तीन चार महिन्यांपूर्वी जे आंदोलन सुरू केले त्यातील बेमुदत काम बंद आंदोलन ज्या दिवशी सुरू होणार त्याच दिवशी दुपारी राज्याच्या मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाला चर्चेसाठी बोलाविले. आंदोलन सुरू होण्याच्या पूर्वी चर्चेसाठी न बोलाविणे व प्रत्यक्ष आंदोलन सुरू झाल्यानंतर चर्चेला सुरुवात करणे, शिक्षणमंत्र्यांच्या या कृतीतून या प्रश्नाकडे पाहण्याची त्यांची वृत्ती कोणाच्याही चटकन् लक्षात आल्याशिवाय राहणार नाही.

**२.** दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी त्यांनी ही बैठक बोलाविली. "ही बैठक बोलाविण्याचा जो सोहळा" त्यांनी आयोजित केला व तसे करतांना त्यांनी किती घोळ करून ठेवला होता किंवा किती घोळ करून ठेवले होते ह्या गोष्टी पाहण्यासारख्या आहेत. अशी बैठक मुंबईला मंत्रालयात बोलाविण्यात येत असल्याचे निमंत्रण देणारे एक पत्र मा. संचालक उच्च शिक्षण यांच्या कार्यालयामार्फत प्राप्त झाले येथूनच हा सोहळा सुरू होतो. मा. उच्च शिक्षण मंत्री यांनी **मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाबाबत अत्यंत चुकीची माहिती पसरविण्याचा या पत्रामार्फत प्रयत्न केला. हे दुर्दैवाने नमूद करावेसे वाटते.**

**३.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्ष व सचिवांना दिनांक २१ सप्टेंबर २०१८ या तारखेचे जे उपरोक्त पत्र प्राप्त झाले त्याचा मथळा "मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी **याचिका क्रमांक १३२६/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार** शिक्षक व शिक्षक संघटना यांच्या मागण्या/समस्या/तक्रारीवर निर्णय घेण्यासाठी **राज्यस्तरावर विशेष समिती गठीत करण्याबाबत.**" असा ठेवण्यात आला. मंत्रिमंडळाने घेतलेल्या किंवा न घेतलेल्या निर्णयातून उद्‌भवणाऱ्या व्यथा निवारणासाठी शिक्षकांनी सचिवांच्या समितीसमोर म्हणणे मांडावे अशा प्रकारचा कोणताही आदेश मा. उच्च न्यायालयाने कोणत्याही प्रसंगी दिलेला नाही हे ठामपणे नमूद करण्यात येत आहे आणि त्यामुळे **मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार उच्च शिक्षण विभाग ही कार्यवाही करीत आहे हा त्यांनी निर्माण केलेला आभास संपूर्णपणे भ्रममूलक असून तद्दन वस्तुस्थितीवर आधारित नाही.**

**४.** राज्यशासनाने **राज्यस्तरावर विशेष समिती गठीत करण्याचे कृत्य** हे उच्च न्यायालयाच्या निर्णयावर आधारित आहे असेही भासविण्याचा प्रयत्न २१ सप्टेंबर

---

### *महासंघाच्या कार्यकारी मंडळाचा सुधारित इतिवृत्तावरील ठराव*
### *(१०.१०.२०१८ रोजीच्या बैठकीत संमत केलेला)*

# संघटनेने सुरू केलेले आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाच्या बुधवार, दिनांक १० ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या तातडीच्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय

(१) कार्यकारी मंडळाच्या आज बुधवार, दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या तातडीच्या बैठकीत मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजीच्या बैठकीचे, दिनांक ८ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या उच्च शिक्षण विभागाच्या पत्रान्वये पाठविण्यात आलेले **सुधारित इतिवृत्त, विचारात घेण्यात आले.**

(२) सुधारित इतिवृत्तामध्ये समाविष्ट असलेल्या विषय क्रमांक १, २, ३ व ५ मध्ये बऱ्याच सकारात्मक सुधारणा करण्यात आल्याचे दिसून येते. सुधारित इतिवृत्ताचा शेवटचा समारोपीय परिच्छेद मा.शिक्षणमंत्र्यांनी स्वतः लक्ष घालून पूर्णपणे सकारात्मक भावनेने दुरुस्त व सुधारित केल्याचे स्पष्टपणे दिसून येते. "विद्यार्थी हित लक्षात घेता शिक्षकांनी संप मागे घेण्याबाबत मा. मंत्री महोदयांनी शासनातर्फे आवाहन केले. लोकशाही मध्ये आंदोलन करण्याचा अधिकार आहे, पण विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून योग्य निर्णय घेतल्यास शासनही प्राध्यापकांचे नुकसान होऊ देणार नाही असे मा. मंत्री महोदयांनी शिक्षक संघटनांना आश्वासित केले." त्यांनी व्यक्त केलेल्या या भावनेला सकारात्मक प्रतिसाद द्यावा असे या कार्यकारी मंडळाचे मत असून त्या मतापोटी **संघटनेने सुरू केलेले आंदोलन मागे घेण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.**

(३) उद्या दिनांक ११ ऑक्टोबर २०१८ रोजी सर्व शिक्षकांनी कामावर रुजू व्हावे असा निर्णय घेण्यात येत आहे. आंदोलनाचा भाग म्हणून दिनांक १२ ऑक्टोबर २०१८ रोजी त्या त्या विद्यापीठांवर मोर्चा आयोजित करण्याचा कार्यक्रम रद्द करण्यात येत आहे. त्या ऐवजी घटक संघटनांच्या शिष्टमंडळाने दिनांक १२ ऑक्टोबर २०१८ रोजी आपापल्या विद्यापीठांच्या मा. कुलगुरूंची भेट घेऊन एक म्हणजे २५ सप्टेंबर २०१८ रोजीच्या बैठकीचे सुधारित इतिवृत्त व दुसरे म्हणजे महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक १० ऑक्टोबर २०१८ रोजीच्या बैठकीत घेतलेले निर्णय, **हे दोनही त्यांच्या लक्षात आणून द्यावेत असा निर्णय घेण्यात येत आहे.**

**डॉ. तापती मुखोपाध्याय,** *अध्यक्ष* **डॉ. एस. पी. लवांदे,** *सचिव*

(MFUCTO)

२०१८ च्या या पत्रामध्ये करण्यात आलेला आहे. मा. उच्च न्यायालयाने अशा प्रकारची विशेष समिती गठीत करण्याबाबतचे कोणतेही आदेश कधीही दिलेले नाही ही गोष्ट स्पष्टपणे व ठामपणे नमूद करणे आवश्यक आहे. उच्च शिक्षण विभागातील पायघोळपणाचा उत्तम नमूना म्हणून नमूद करण्याची गोष्ट म्हणजे मा. उच्च न्यायालयाने "**...२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार**" असा उल्लेख या पत्राच्या विषयामध्ये व पहिल्या परिच्छेदामध्ये असला तरी कोणत्या रोजी ते आदेश देण्यात आलेले आहेत, हे ना विषयात नमूद करण्यात आलेले आहे, ना पहिल्या परिच्छेदामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळेच अत्यंत गंभीर अशा प्रश्नांच्या बाबतीतसुद्धा उच्च शिक्षण विभागामध्ये किती उथळपणे कारभार चालतो हे स्पष्ट होते.

**५.** बैठकीचे निमंत्रण पाठविणारे २१.०९.२०१८ चे पहिले पत्र व बैठकीचे कार्यवृत्त पाठविणारे २६.०९.२०१८ चे दुसरे पत्र यांचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास असे दिसून येईल की, पहिल्या पत्राचा विषय "मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक १३२६/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार शिक्षक व शिक्षक संघटना यांच्या मागण्या/समस्या/तक्रारीवर निर्णय घेण्यासाठी **राज्यस्तरावर विशेष समिती गठीत करण्याबाबत.**" असा नमूद केलेला होता व बैठकीचे इतिवृत्त पाठवितांना दुसऱ्या पत्राचा विषय पुढील प्रमाणे नमूद करण्यात आला :- "मा. मंत्री (उ.व.तं.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १० मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये गठीत **राज्यस्तरावरील तक्रार निवारण समितीच्या दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्ताबाबत.**" हायकोर्टाच्या आदेशामध्ये राज्यस्तरावर विशेष समिती गठीत करण्याचे आदेश नाहीत हे लक्षात आल्यामुळे हायकोर्टाच्या आदेशाचा भाग पुढे काढून टाकण्यात आला. २१.०९.२०१८ च्या पहिल्या पत्रानुसार पाठविलेल्या निमंत्रणानुसार जेवढ्या लोकांना बैठकीसाठी बोलाविले होते त्याच्याशिवाय कितीतरी जास्तीचे पाहुणे सभेला उपस्थित होते हे कार्यवृत्ताचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यास चटकन् लक्षात येते.

**६.** मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये राज्यस्तरावर विशेष समिती गठीत करण्याबाबत उच्च न्यायालयाचे कोणतेही आदेश नाहीत हे जेव्हा महासंघातर्फे मा. शिक्षणमंत्र्यांना सांगण्यात आले त्यावेळेला त्यांना मोठे आश्चर्य वाटले. सचिव

## *महाराष्ट्र शासन*

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) : महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१

www.dhepune.gov.in : E-mail - vishi.dhepune@nic.in

फोन नं. ०२०-२६१२२११९, २६०५१५१२, २६१२४६३९ फॅक्स -०२०-२६११११५३

*क्रमांक - युएनआय/(१०४/१८)/अधी.३/विशि-१/१६६३२*

**दिनांक - २१ सप्टेंबर २०१८**

**बैठकीची सूचना -**

**दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ दुपारी ३.०० वाजता**

**विषय :-** मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक १३२६/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार शिक्षक व शिक्षक संघटना यांच्या मागण्या/समस्या/तक्रारीवर निर्णय घेण्यासाठी **राज्यस्तरावर विशेष समिती गठीत करण्याबाबत.**

संदर्भ :- शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक न्यायाप्र २०१३/(२१३/१३)/विशि-१ दिनांक १० मार्च, २०१८

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक १३२६/२०१२ रोजी दिलेल्या आदेशानुसार शिक्षक व शिक्षक संघटना यांच्या मागण्या/समस्या/तक्रारीवर निर्णय घेण्यासाठी **राज्यस्तरावर संदर्भिय शासन निर्णयानुसार विशेष समिती स्थापन केलेली आहे.**

त्यानुसार या समितीची बैठक दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालन क्रमांक १०८, १ ला मजला, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ३२ येथे **महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिर्व्हसिटी ॲन्ड कॉलेज टिचर्स असोशिएशन यांच्या प्रतिनिधीसमवेत बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.**

तरी सदर बैठकीसाठी कृपया आपण उपस्थित रहावे ही विनंती.

(हरिभाऊ शिंदे)

वरिष्ठ प्रशासन अधिकारी

शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत - (१) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांचे खाजगी सचिव. (२) मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ यांचे खाजगी सचिव. (३) मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२ (४) मा. अपर मुख्य सचिव, सेवा, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ (५) मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२. (६) मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ (७) मा. सहसचिव, विशि, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ (८) मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे (९) अध्यक्ष व जनरल सेक्रेटरी, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिर्व्हसिटी ॲन्ड कॉलेज टिचर्स ऑरगनायझेशन द्वारा बालाजीनगर, मांडवगण रोड, श्रीगोंदा जि. अहमदनगर

## *महाराष्ट्र शासन*

## *उच्च व तंत्र शिक्षण विभाग,*

क्रमांक :- वेतन-२०१८/प्र.क्र. ५६/१८/विशि-१

**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**दिनांक :- २८ सप्टेंबर, २०१८**

## *आदेश*

विद्यापीठ अनुदान आयोगाने दि. ३१.०१.२०१८ च्या पत्रान्वये केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने दि. ०२.११.२०१७ अन्वये ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी राज्य शासनास पाठविल्या आहेत. त्यानुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर संघटनांनी ७ वा वेतन आयोग तात्काळ लागू करण्याबाबत निवेदने सादर केलेली आहेत. **तसेच एमफुक्टो संघटनेने राज्य तक्रार निवारण समितीच्या दि. २५.०९.२०१८ च्या बैठकीत याबाबत आग्रह धरला,** त्यानुषंगाने राज्यशासकीय कर्मचाऱ्यांसोबतच अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यात येईल असे मा. मंत्रीमहोदयांनी आश्वासीत केलेले आहे.

**केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयांतील शिक्षकांना शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना सातव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतनश्रेण्या लागू करणे आवश्यक आहे.** केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या दि. २ नोव्हेंबर २०१७ च्या पत्रामध्ये विशद सुधारित वेतनसंरचनेच्या तरतुदी व इतर बाबींचा सखोल अभ्यास करून शासन निर्णयाचे प्रारुप तयार करण्यासाठी खालीलप्रमाणे समित्या गठीत करण्यात येत आहेत.

**अ) शिक्षक व शिक्षक समकक्ष पदे.** :- (१) श्री. विजय नारखेडे, सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे (२) श्री. विठ्ठल मोरे, सहयोगी प्राध्यापक, शासकीय ज्ञान विज्ञान संस्था, औरंगाबाद (३) श्री.प्रकाश बच्छाव, प्रशासन अधिकारी, सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे (४) श्री. सुयश दुसाणे, प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण (मुख्यालय), पुणे (५) श्री. अरविंद भागवत, वरिष्ठ लिपीक, सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण, पुणे विभाग

२. तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देखील राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे ७ वा वेतन आयोग लागू करणे आवश्यक आहे, त्या संदर्भातील तरतुदींचा अभ्यास करून मंत्रिमंडळापुढे सादर करण्यासाठी सविस्तर प्रस्ताव स्वयंस्पष्ट अभिप्रायासह शासनास सादर करावा.

**ब) शिक्षकेतर पदे.** :- (१) श्री. दिलीप भरड, उपकुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद (२) श्री.प्रकाश बच्छाव, प्रशासन अधिकारी, सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे (३) श्री. सुयश दुसाणे, प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण (४) श्री. अरविंद भागवत, वरिष्ठ लिपीक, सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण, पुणे विभाग

उपरोक्त दोन्ही समित्यांनी कार्यवाही पूर्ण करून प्रस्ताव १५ दिवसांमध्ये शासनास सादर करावा.

**(विजय साबळे)**

**शासनाचे अवर सचिव**

प्रति, (१) श्री. विजय नारखेडे, सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे (२) श्री. विठ्ठल मोरे, सहयोगी प्राध्यापक, शासकीय ज्ञान विज्ञान संस्था, औरंगाबाद (३) श्री. प्रकाश बच्छाव, प्रशासन अधिकारी, सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे (४) श्री. सुयश दुसाणे, प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण (मुख्यालय), पुणे (५) श्री. अरविंद भागवत, वरिष्ठ लिपीक, सहसंचालक कार्यालय, उच्च शिक्षण, पुणे विभाग (६) श्री. दिलीप भरड, उपकुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीसाठी** (१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे (२) विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे (३) कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना विनंती करण्यात येते की, सदरहू कामकाजासाठी श्री. दिलीप भरड, उपकुलसचिव यांच्या सेवा उपलब्ध करून देण्यात याव्यात. (४) प्राचार्य, शासकीय ज्ञान विज्ञान संस्था, औरंगाबाद. (५) निवड नस्ती (विशि-१)

आणि मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी “काढा काढा तो हायकोर्टाचा निर्णय काढा” असे म्हणून जेव्हा प्रत्यक्ष परिच्छेद २४ वाचायला सुरुवात केली त्यावेळेला त्यांच्या असे लक्षात आले की, आम्ही त्यांना वाचून दाखविलेला परिच्छेद २४ व ते वाचत असलेला परिच्छेद २४ हा सारखाच होता. एका शब्दाचाही त्यामध्ये फरक नव्हता आणि राज्यस्तरावर विशेष समिती गठन करण्याबाबतचे आदेश त्यात कोठेही दिसून येत नव्हते. मूळ आदेशातील Grievances Redressal Mechanism स्थापन करण्याबाबतची कामगिरी उच्च शिक्षण विभागाने अजूनही पूर्णपणे पार पाडली नाही ही गोष्ट तेव्हा स्पष्ट झाली. विशेष समिती गठीत करण्याचा उल्लेख जेव्हा हायकोर्टाच्या निर्णयामध्ये कुठेच दिसत नव्हता तेव्हा महासंघातर्फे त्यांना अशी विनंती करण्यात आली की, व्यथा निवारक यंत्रणा ही तुम्ही निटपणे स्थापन केलेली नाही. जी काही विशेष समिती तुम्ही स्थापन केलेली आहे त्यामध्ये निदान १८ ते २० तरी सदस्य आहेत. आपण शिक्षणमंत्री म्हणून या विभागाचे प्रमुख आहात तेव्हा आपण या बाबतीत आमचे म्हणणे ऐकून घ्या त्यावेळेला मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी एकदम ती विनंती मान्य केली व मी शिक्षणमंत्री या नात्याने तुमचे म्हणणे ऐकून घ्यायला तयार आहे असे सांगितले व मग चर्चेला सुरुवात झाली. या वेळेला त्यांच्या राजकीय पक्षामध्ये शिक्षण चळवळीमध्ये काम करणारे एक नेते तावातावाने उठून उभे राहिले व भाषण देऊ लागले ते असे की, “एवढ्या मेहनतीने शासनाने विशेष समिती स्थापन केलेली आहे तेव्हा महासंघाच्या या लोकांना त्या समितीसमोरच आपले म्हणणे मांडावे लागेल.” तेव्हा महासंघातर्फे मा. शिक्षण मंत्र्यांना असे सांगण्यात आले की, “तुम्ही निर्णय दिल्यानंतरसुद्धा त्या निर्णयावर हे गृहस्थ वाद करीत आहेत. तेव्हा त्यांना आवरणे हे तुमचेच काम आहे.” त्यावर मा. शिक्षणमंत्र्यांनी एक सुंदर विनोद केला. तो असा की, “अहो ! एखादा मनुष्य मला पाठिंबा देत असेल तर तेवढा तरी देऊ द्या.”

७. दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजीच्या या विशेष समितीच्या बैठकीचा जो सोहळा पार पडला त्यातील एक विशेष गंमत नमूद करणे आवश्यक वाटते. “१८ ते २० लोकांची समिती कोणाचे म्हणणे कसे काय ऐकून घेणार?” अशी मांडणी ज्यावेळेला महासंघातर्फे करण्यात आली त्यावेळेला मा. उच्च शिक्षण मंत्री स्वतः असे म्हणाले, “या समितीमध्ये १८ ते २० लोकं कुठे आहेत? फक्त १० ते १२ लोकंच समितीत असतील.” महासंघाने ज्यावेळेला पुन्हा आपले म्हणणे लावून धरले त्यावेळेला मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी तो शासन निर्णय आपल्या समोर धरला आणि आपल्या उजव्या हाताच्या अंगठ्याला त्याच हाताच्या इतर बोटांवर भिडवून दिले व प्रत्यक्ष एक एक करून मोजमाप करायला सुरुवात केली. मोजता मोजता जेव्हा ही संख्या १८ च्या वर जायला लागली तेव्हा त्यांच्या उजव्या हाताच्या अंगठ्याने इतर बोटांना मोकळे केले. अजिबात विचार न करता राज्यकर्ते ज्यावेळेला एखादा शासननिर्णय निर्गमित करतात त्या प्रत्येक वेळेला राज्यकर्त्यांचे वैचारिक दारिद्र्य उघडे पडतेच असे नाही. याठिकाणी मात्र ज्यावेळेला १८ च्या पुढे संख्या गेली तेव्हा शिक्षणमंत्र्यांच्या उजव्या हाताच्या अंगठ्याने काम करणे बंद केले पण असा शासननिर्णय निर्गमित करण्यामागे असलेले विभागाचे वैचारिक दारिद्र्य त्या टेबलावर व त्या टेबलाच्या माध्यमातून सबंध महाराष्ट्रासमोर उघडे पडले.

# NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

## महाराष्ट्र प्राध्यापक महासंघातर्फे दिनांक २५ सप्टेंबर २०१८ ते दिनांक १० ऑक्टोबर २०१८ या दरम्यान झालेल्या आंदोलनाच्या घटनाक्रमाची माहिती देण्यासाठी जिल्हास्तरीय सभांचे आयोजन

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक १७ जून २०१८ रोजी संमत केलेल्या ठरावानुसार दिनांक २५ सप्टेंबर २०१८ ते १० ऑक्टोबर २०१८ पर्यंत म्हणजे एकूण १६ दिवस झालेल्या आंदोलनानंतर दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. उच्च शिक्षणमंत्री यांच्या सोबत महासंघाशी झालेल्या चर्चेचे दिनांक २६ सप्टेंबर २०१८ रोजी प्राप्त झालेले **मूळ इतिवृत्त** व दिनांक ८ ऑक्टोबर २०१८ रोजी प्राप्त झालेले **सुधारित इतिवृत्त** या सर्व घटनाक्रमांशी संबंधीत असलेली कागदपत्रे याच अंकात प्रसृत करण्यात आलेली आहेत. या सर्व घटनाक्रमाची सर्व शिक्षकांना माहिती देण्यासाठी अमरावती व नागपूर विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या जिल्हानिहाय सभांचे आयोजन खाली दिलेल्या दिवशी, दिनांकास, वेळी व स्थळी, केलेले आहे.

**तक्ता**

| अ.नं. व जिल्ह्याचे नांव | सभेचा दिवस व दिनांक | सभेची वेळ | सभेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ २ | ३ | ४ | ५ |
| १. अमरावती | रविवार, १४.१०.२०१८ | दुपारी ४.०० वा. | श्रीमती के.एल. महाविद्यालय, अमरावती |
| २. अकोला | सोमवार, १९.१०.२०१८ | दुपारी ४.३० वा. | श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला. |
| ३. यवतमाळ | शनिवार, २०.१०.२०१८ | दुपारी ४.३० वा. | अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ. |
| ४. नागपूर (भंडारा/गोंदीया) | रविवार, २१.१०.२०१८ | दुपारी ४.०० वा. | शिवाजी विज्ञान महाविद्यालय, नागपूर |
| ५. वर्धा | गुरूवार, २५.१०.२०१८ | दुपारी ४.०० वा. | यशवंत महाविद्यालय, वर्धा. |
| ६. वाशिम | शुक्रवार, २६.१०.२०१८ | दुपारी ४.०० वा. | आर.ए.महाविद्यालय, वाशिम |
| ७. बुलढाणा | शनिवार, २७.१०.२०१८ | दुपारी ४.०० वा. | जिजामाता महाविद्यालय, बुलढाणा |
| ८. चंद्रपूर व गडचिरोली | रविवार, २८.१०.२०१८ | दुपारी ४.०० वा. | एस.पी. कॉलेज, चंद्रपूर |

सभेला नुटाचे पदाधिकारी उपस्थित राहून संबोधित करतील. सभेचे आयोजन त्या त्या जिल्ह्यातील जिल्हा शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी करावयाचे आहे. तरी या सभेला सर्व प्राध्यापकांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**डॉ. विलास ढोणे, सचिव, नुटा**

**८.** सुनावणी कोण करीत आहे हे फक्त शिक्षणमंत्र्यांनाच कळत होते. उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये विशेष समिती स्थापन करण्याचे आदेश कुठेही नाहीत ही गोष्ट लक्षात आणून दिल्यावर खुद्द शिक्षणमंत्र्यांनी असे सांगितले की, मी शिक्षणमंत्री म्हणून तुमचे म्हणणे ऐकून घेतो. त्यांच्या निर्णयाप्रमाणे पुढे काम सुरू झाले. मात्र त्यानंतर सुद्धा एखाद्या विषयावर चर्चा करण्यासाठी **या समितीची बैठक** बोलाविण्यात आली होती की, सर्व विषयावरील प्रश्नांच्या बाबतीत समितीला निर्णय करावयाचा आहे याची समितीच्या कोणत्याही सदस्यामध्ये स्पष्टता नव्हती. कधी विशेष समिती तर कधी तक्रार निवारण समिती असे वेगवेगळे शब्द लिखित दस्तऐवजांमध्ये आढळून येतील. प्रत्यक्ष चर्चेत तर सारा आनंदी आनंदच होता. शासन निर्णयानुसार स्थापित झालेल्या त्या समितीमध्ये विद्यापीठांचे मा. कुलगुरू हे सदस्य असल्यामुळे उपस्थित होते. त्यांना कोणतीही कागदपत्रे व समितीच्या कामकाजाचे नियम पुरविण्यात आलेले नव्हते. एवढा भोंगळ कारभार असल्यामुळे एकाही मा. कुलगुरूंनी या सभेत एक शब्दसुद्धा उच्चारला नाही. शासननिर्णयामध्ये कुलगुरूंच्या ऐवजी दुसरे कोणी उपस्थित राहण्याची तरतूद नसतांना एका विद्यापीठाचे प्र-कुलगुरू आणि दुसऱ्या एका विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक हे 'त्यांच्या' ऐवजी 'आम्ही' आलो या नेहमीच्या सवयीप्रमाणे त्या बैठकीत बसले होते. इतर वेळी 'हे' च्या ऐवजी 'ते' ठीक आहे पण या शासननिर्णयात तशी तरतूद नाही. मुळातच गांभीर्य नसल्यामुळे त्यांनीच ते गंभीरपणे पाळण्याची अपेक्षा करणे हे चूकच होय. एका विशिष्ट प्रश्नावरील चर्चा संपल्यानंतर खुद्द शिक्षणमंत्र्यांनी असे सांगितले की, आता कुलगुरू जाऊ शकतात आणि त्याप्रमाणे उपस्थित असलेले सर्व विद्यापीठांचे मा. कुलगुरू निघून गेले. पुढची सुनावणी शिक्षणमंत्री स्वतःच करीत होते. एकतर हा सारा प्रकार पाहिला तर या बैठकीची कोणतीही कामकाज पत्रिका त्यांनी तयार केलेली नव्हती आणि तीन महिन्यांपूर्वी नोटीस मिळूनसुद्धा आपण अजिबात जागचे हललो नाही अशी बदनामी आपल्या पदरात बांधली जाऊ नये म्हणून शिक्षणमंत्र्यांनी कशीतरी घाईगडबडीत प्रत्यक्ष आंदोलन सुरू झाल्याच्या दिवशी ही बैठक बोलाविली होती असे दिसून येते.

**९.** आणखी एक महत्त्वाचा मुद्दा नमूद केला पाहिजे तो असा की, सुनावणी समिती करीत आहे की, शिक्षणमंत्री करीत आहे याबाबतचा घोळ आणि गोंधळ हा शेवटपर्यंत शिक्षणमंत्र्यांनी कायम ठेवला. त्याचे जे इतिवृत्त त्यांनी काढले त्यामध्ये **"राज्यस्तरावरील तक्रार निवारण समितीची दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्त"** असे त्यांच्या विभागाने पाठविलेल्या २६ सप्टेंबर २०१८ रोजीच्या पत्रात म्हटलेले असले तरी प्रत्यक्ष बोलाविलेले व न बोलाविलेले कोण कोण व्यक्ती हजर होते याच्या यादीशिवाय त्या समितीचे कोणतेही इतिवृत्त त्या इतिवृत्तात समाविष्ट नाही. मग त्या इतिवृत्तात आहे काय? तर मा. उच्च शिक्षणमंत्री यांचे प्रत्येक विषयाच्या बाबतीत निर्देश एका तक्त्यामध्ये दिलेले आहेत. समितीचे इतिवृत्त म्हणायचे आणि नुसते मंत्र्यांचे निर्देश छापायचे. त्या समितीने ते इतिवृत्त संमत केलेले नाही, हे १०० टक्के माहिती असतांना समितीच्या नावावर ते इतिवृत्त खपविणे हे सभाशास्त्रामध्ये लांछनीय समजली जाते ही गोष्ट मा. शिक्षणमंत्र्यांना ठाऊक नसेल असे कसे म्हणता येईल. या महासंघाला ही गोष्ट नमूद करतांना मनापासून खेद वाटतो की, समितीचे इतिवृत्त म्हणून उच्च शिक्षण विभागाने आम्हाला जे इतिवृत्त दिलेले आहे ते इतिवृत्त त्या समितीने मान्य केलेले नाही. निरनिराळ्या विद्यापीठांचे मा.कुलगुरू शासन निर्णयाने ज्या समितीमध्ये सदस्य आहेत, त्या समितीचे इतिवृत्त त्या समितीच्या बैठकीमध्ये मान्य करवून न घेता प्रसृत करण्याचे उच्च शिक्षण विभागाचे हे कृत्य मा. कुलगुरूंच्या पदाकडे उच्च शिक्षण मंत्री कोणत्या नजरेने पाहतात याचे प्रतिनिधीत्व करणारे आहे. विद्यापीठाच्या कुलगुरूसारख्या महत्त्वपूर्ण पदावर काम करणाऱ्या अनेक व्यक्तिंना, ते केवळ सभेला काही वेळ उपस्थित होते याचा लाभ घेऊन त्या समितीची बैठक बोलावून इतिवृत्त त्या समितीने संमत केलेले नसतांना ते त्यांच्या नावावर खपविणे कितपत योग्य आहे याचा थोडा तरी विचार मा.शिक्षणमंत्र्यांनी करायला हवा होता.

**१०.** शासनाने निर्णय घेण्यास विलंब लावण्याची जी काय कारणे असतील, ती असतील. शिक्षकांनी असहकार करण्याचे जे काही समर्थन असेल ते असेल, पण शिक्षक आणि शासन यांच्या या संघर्षामध्ये विद्यार्थ्यांनाच त्रास होणार. यापुढे असे होऊ नये म्हणून **व्यथा निवारक यंत्रणा स्थापन करण्यात यावी** असे मा. उच्च न्यायालयाने आदेशित केले. अशी यंत्रणा ३१ जुलै २०१३ च्या अगोदर स्थापित झाली पाहिजे असे मुदतीचे बंधनसुद्धा मा. खंडपिठाने घालून दिले. ही बाब मा.

*तात्काळ / ई-मेलद्वारे*

## *महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,*

क्रमांक :- न्यायाप्र-२०१३/प्र.क्र.३५७/१३/विशि-१ : मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**दिनांक :- २६ सप्टेंबर, २०१८**

**बैठकीचा विषय :-** मा. मंत्री (उ.व.तं.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १० मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये गठीत राज्यस्तरावरील तक्रार निवारण समितीच्या दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्ताबाबत.

महोदय,

मा. मंत्री (उ.व.तं.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १० मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये गठित राज्यस्तरावरील तक्रार निवारण समितीची दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्त आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,
**(विजय साबळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीसाठी (१) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई (२) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) समितीचे उपाध्यक्ष, यांचे खाजगी सचिव (३) अ.मु.स. (सेवा/सा.प्र.वि.) समितीचे सदस्य (४) प्रधान सचिव (वित्त विभाग) समितीचे सदस्य (५) प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग) समितीचे सदस्य (६) सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) समितीचे सदस्य (७) सहसचिव/उप सचिव (विशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, समितीचे सदस्य (८) उप सचिव (मशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग (९) उपसचिव (तांशि), उच्च व तंत्र शिक्षण (१०) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे (११) कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे - समितीचे सदस्य (१२) अध्यक्ष, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिर्व्हसिटी ॲण्ड कॉलेज टिचर्स ऑर्गनायझेशन (एमफुक्टो), विद्यापीठ विद्यार्थी भवन, "बी" रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२० (१३) अध्यक्ष, अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघ (ABRSM) पुणे (१४) निवड नस्ती (विशि-१)

उच्च व तंत्र शिक्षण विभाग/विशि-१

मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १० मार्च, २०१६ अन्वये गठीत राज्यस्तरीय तक्रार समितीच्या दि. २५.०९.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

**उपस्थितांची यादी :-** (१) बाळाराम द. पाटील, विधानपरिषद सदस्य (२) दत्तात्रय अ. सावंत, विधानपरिषद सदस्य (३) श्री. श्रीकांत देशपांडे, विधानपरिषद सदस्य (४) श्री. सीताराम कुंटे, अपर मुख्य सचिव, सेवा, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय (५) श्री. राजीव कु. मित्तल, सचिव, व्यय, वित्त विभाग, मंत्रालय (६) श्री. सौरभ विजय, सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय (७) श्री. सिद्धार्थ खरात, सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय (८) श्रीम. रोहिणी भालेकर, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय (९) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे, मंत्रालय (१०) श्री. विजय साबळे, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय (११) डॉ. वैभव एकनाथ नरवडे, अध्यक्ष मुंबई युनिर्व्हसिटी ॲण्ड कॉलेज टिचर्स असो, (MUCTA) (१२) प्रा. प्रदीप दा. खेडकर, अध्यक्ष, अमरावती विद्यापीठ शिक्षण मंच (१३) प्रा. शेखर चंद्रात्रे, सचिव, ABRSM, महाराष्ट्र (१४) डॉ. अनिल कुलकर्णी, अध्यक्ष, ABRSM, महाराष्ट्र (१५) प्रा. दिनेश सुर्यवंशी, उपाध्यक्ष, ABRSM, महाराष्ट्र (१६) डॉ. नितिन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (१७) डॉ. मुरलीधर चांदेकर, कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती (१८) डॉ. सिद्धार्थ विनायक काणे, कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर (१९) प्रा. शशीकला वंजारी, कुलगुरू, श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई (२०) श्री. सुहास पेडणेकर, कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई (२१) डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (२२) डॉ. रवि एन. सरोदे, संचालक - परिक्षा व मु. मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (२३) प्रा. तपती मुखोपाध्याय, अध्यक्ष, महाराष्ट्र महासंघ (२४) प्रा. एस. पी. लवांडे, सरचिटणीस, महाराष्ट्र महासंघ (२५) प्रा. बी. टी. देशमुख, सदस्य, महाराष्ट्र महासंघ (२६) प्रा. पी. बी. रघुवंशी, सदस्य, महाराष्ट्र महासंघ (२७) प्रा. आर. एच. पाटीस, सदस्य, महाराष्ट्र महासंघ (२८) प्रा. एस. एस. सोनावणे, सदस्य, महाराष्ट्र महासंघ (२९) प्रा. एस. के. आवताडे, सदस्य, महाराष्ट्र महासंघ (३०) प्रा. मधु परांजपे, सदस्य, महाराष्ट्र महासंघ (३१) प्रा. एस. के. पवार, सदस्य, महाराष्ट्र महासंघ (३२) प्रा. एस. एम. जोगदंड, सदस्य, महाराष्ट्र महासंघ

उच्च शिक्षण मंत्र्यांच्या लक्षात आणून देण्यात आली होती. मंत्रिमंडळाच्या निर्णयातून उद्‌भवणाऱ्या व्यथा निर्मूलनासाठी सचिवांसमोर जा असे त्या निर्णयात कोठेही नाही. विशेष समिती स्थापन करण्याचा निर्णय तर त्यामध्ये नाहीच नाही.

**११.** विभागातर्फे अंतिम निर्णय घोषित करावयाचा असेल तर कोणत्याही विभागाच्या मंत्र्यांना दोन मार्ग उपलब्ध असतात. एक म्हणजे कष्टपूर्वक व मेहनतीने इतर सर्व संबंधित विभागांची मान्यता मिळविणे, गरज असल्यास मंत्रिमंडळाची मान्यता मिळविणे व त्यानंतर अंतिम निर्णय जाहीर करणे ही पहिली पद्धती व दुसरी पद्धती म्हणजे **"मी आता तुमचे म्हणणे ऐकून घेतलेले आहे आमच्या विभागाला मी निर्देश देतो"** त्यानंतर मग हे संदर्भ यथावकाश सर्व संबंधित विभागात फिरतील व जेंव्हा, केंव्हा अंतिम निर्णय होईल तेव्हा तो होईल, ही अंतिम निर्णय करण्याची दुसरी पद्धती. मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी दुसऱ्या पद्धतीचा अवलंब केला हे उघड दिसून येते.

## भाग : दोन

**१२.** सर्वसाधारणपणे उच्च शिक्षण विभागाने व मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी किती गंभीरपणे या बैठकीच्या आयोजनाकडे पाहिले होते याबाबतची ढोबळमानाने माहिती नमूद केल्यानंतर आता क्रमशः प्रत्येक मागणीच्या बाबतीत झालेल्या घटनाक्रमाचा अहवाल पुढील परिच्छेदातून सादर करण्यात येत आहे. दिनांक २६ सप्टेंबर २०१८ रोजी अवर सचिव महाराष्ट्र शासन यांनी जे एकतर्फी इतिवृत्त पाठविले त्या इतिवृत्तामध्ये **नमूद करण्यात आलेला क्रम** हा पुढील अहवाल सादर करतांना जसाच्या तसा ठेवण्यात आलेला आहे. चर्चेसाठी जे विषय घेण्यात आले त्या प्रत्येक विषयाचा **मथळासुद्धा** शासनाने काढलेल्या एकतर्फी इतिवृत्तात जसा आहे तसाच ठेवलेला आहे. **मा. मंत्री यांचे निर्देश** हे सुद्धा त्यानंतर जसेच्या तसे नमूद केलेले आहेत. **महासंघातर्फे मांडण्यात आलेली बाजू :** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाने त्यांच्यासमोर जे म्हणणे मांडले ते त्यांना सादर करण्यात आलेल्या निवेदनावर व प्रत्यक्ष चर्चेमध्ये करण्यात आलेल्या प्रतिपादनावर आधारित आहे. तपशील न देता महासंघातर्फे मांडण्यात आलेले मुद्दे फक्त नमूद केलेले आहेत. याठिकाणी एक निरीक्षण नोंदविणे आवश्यक आहे. महासंघाने दिलेली सर्व निवेदने, त्यातून मांडण्यात आलेले युक्तीवाद, समर्थनार्थ उभे केलेले पुरावे या सर्व बाबी मा. मंत्रिमहोदय काळजीपूर्वक वाचून आलेले आहेत असे स्पष्टपणे दिसत होते. तथापि, त्यावरील एकाही बाबतीत उच्च शिक्षण विभागाचा युक्तीवाद किंवा उत्तर इतिवृत्तात नमूद करण्याचे धैर्य त्यांना झाले नाही. यातच सर्व आले.

**१३.** मागणी क्रमांक **एक बाबत,** विषय काय होता? मा. मंत्री यांचे निर्देश काय आहेत? महासंघातर्फे काय बाजू मांडण्यात आली होती याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत.

**अ.क्र.** : १,

**विषय** :- प्राध्यापक भरतीवरील बंदी उठवून भरती प्रक्रिया सुरू करावी.

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय एकाकी पदांवरील तसेच काही शिक्षकेतर तांत्रिक पदांवरील बंदी १०० टक्के आणि अधिव्याख्यात्यांच्या **रिक्त पदांवरील बंदी काही प्रमाणात उठविण्याबाबतची कार्यवाही सुरू असून, या संदर्भातील शासन निर्णय लवकरच निर्गमित होईल.**

**महासंघातर्फे मांडण्यात आलेली बाजू :-**

**१३.१ UGC REGULATIONS**

**१३.२** In The Gazette of India Extraordinary : Part III : Section 4 Published By Authority New Delhi, Wednesday, July 18, 2018 : **"UGC Regulations on minimum qualifications for appointment of teachers and other academic staff in universities and colleges and measures for the maintenance of standards in Higher Education, 2018"**

**१३.३** भारतीय घटनेच्या सातव्या परिशिष्टातील पहिल्या सूचीमध्ये म्हणजे केंद्रसूचीमध्ये ६६ व्या क्रमांकावर "Co-ordination and determination

---

मूळ इतिवृत्तात मजकूर स्तंभ १ : अ.क्र. स्तंभ २ : विषय, स्तंभ ३ : मा.मंत्री यांचे निर्देश, असा एका तक्त्यात दिलेला आहे. इथे तो मजकूर शब्दशः धावत्या मजकुराच्या स्वरूपात दिलेला आहे. - संपादक

अ.क्र. :-

विषय :-

मा. मंत्री यांचे निर्देश :-

**(१) विषय :- प्राध्यापक भरती वरील बंदी उठवून भरती प्रक्रिया सुरू करावी.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय एकाकी पदांवरील तसेच काही शिक्षकेतर तांत्रिक पदांवरील बंदी १०० टक्के आणि अधिव्याख्यात्यांच्या रिक्त पदांवरील बंदी काही प्रमाणात उठविण्याबाबतची कार्यवाही सुरू असून, या संदर्भातील शासन निर्णय लवकरच निर्गमित होईल.

**(२) विषय :- ७१ दिवसांच्या संप काळातील थकीत वेतन मिळावे.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- विभागाने यासंदर्भात वस्तुस्थितीदर्शक प्रस्ताव तयार करून वित्त विभागाकडे सादर करण्याची कार्यवाही करावी.

**(३) विषय :- सातवा वेतन आयोग लागू करावा.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- राज्यशासकीय कर्मचारी यांच्यासोबतच विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना सातवा वेतन आयोग लागू होईल.

**(४) विषय :- जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करावी.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- सन २००५ पासून राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू केलेली आहे. त्यामुळे सन २००५ पासून पुढे नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्त वेतन योजना लागू करता येणार नाही. तसेच नवीन परिभाषित अंशदायी निवृत्त वेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना DCPS क्रमांक दिले आहेत याची खातरजमा करावी व त्यानुषंगाने होणारी कपातीबाबतची माहिती कर्मचाऱ्यांना मिळेल यासंदर्भात संचालक, उच्च शिक्षण यांच्या स्तरावर आढावा घ्यावा.

**(५) विषय :- विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील सेवकांसाठी वेतन व्यवस्था निर्माण करावी.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- याबाबत तपासणी करून विभागाने त्यावर योग्य ती कार्यवाही करावी. शुल्क नियंत्रण समितीद्वारा रचना उभी करावी.

**(६) विषय :- विनाअनुदानित महाविद्याल/विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित व पूर्ण वेतन मिळावे.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- याबाबत तपासणी करून विभागाने त्यावर योग्य ती कार्यवाही करावी.

**(७) विषय :- मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व्यथा निवारण समिती स्थापित करावी.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- यासंदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. १३२६/२०१२ मध्ये दिलेल्या आदेशानुसार शिक्षक व शिक्षक संघटना यांच्या मागण्या/समस्या/तक्रारीवर निर्णय घेण्यासाठी दि. १०.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरावर विशेष समिती गठीत करण्यात आलेली आहे.

**(८) विषय :- विद्यापीठातील नॉमिनेशनचा धुमाकूळ कमी करण्यासाठी उपाययोजना करावी.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदी विधानमंडळाच्या संयुक्त समितीच्या शिफारशीनुसार करण्यात आलेल्या आहेत. तथापि, याबाबत तपासणी करून ज्या विद्यापीठात चुकीच्या नेमणुका झाल्या आहेत त्या दुरुस्त कराव्यात.

**(९) विषय :- सहाव्या वेतन आयोगातील त्रुटी दूर करणे.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- १. पीएच. डी. वेतनवाढी मुळे स्टेप-अप संदर्भात उद्‌भवलेली/होणारी न्यायालयीन प्रकरणे व त्यावर मा. न्यायालयाचे आदेश इ. विचारात घेऊन तसा प्रस्ताव वित्त विभागास सादर करावा.

**(१०) विषय :- तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधनात सुधारणा करण्याबाबत.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर सुधारित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून या संदर्भातील शासन निर्णय लवकरच निर्गमित होईल.

वरीलप्रमाणे मा. मंत्री महोदयांनी निर्देश दिले व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही ही बाब विचारात घेऊन शिक्षक संघटनांनी पुकारलेला संप मागे घेण्याबाबत आवाहन केले.

वरील सर्व विषयांवर चर्चा होऊन बैठक समाप्त झाली.

of standards in institutions for higher education or research and scientific and technical institutions." हा विषय नमूद करण्यात आलेला आहे.

**१३.४** केंद्र सूचित असलेल्या विषयाबाबत विधिविधानाचे व प्रशासनाचे अधिकार हे केंद्र शासनाला व संसदेलाच असतील अशी घटनेच्या कलम २४६ मध्ये तरतूद आहे. ती पुढीलप्रमाणे :- "..... Parliament has exclusive power to make laws with respect to any of the matters enumerated in List I in the Seventh Schedule (in this Constitution referred to as the "Union List")"

**१३.५ घटनेने दिलेल्या या अधिकाराचा वापर करून केंद्राने "विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम १९५६" हा कायदा पारित केला. या कायद्याच्या २६ व्या कलमान्वये रेग्युलेशन करण्याचे अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगाला प्रदान करण्यात आलेले आहेत.**

**१३.६** १५ फेब्रुवारी २०११ रोजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने काढलेल्या शासननिर्णयामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ३० जून २०१० च्या रेग्युलेशनमधील परिच्छेद १२ बाबत "या परिच्छेदातील सर्व उपपरिच्छेद म्हणजे १२.० ते १२.२ येथील सर्व बाबी जशाच्या तशा लागू करण्यात येत आहेत." असा शासन निर्णय आहे.

**१३.७** सन २०१८ च्या रेग्युलेशनमधील परिच्छेद १२ ते १२.२ हे बंधनकारक असून त्याची अंमलबजावणी न होणे हे घटनाबाह्य कृत्य होय. त्या रेग्युलेशन्सची बंधनकारकता लक्षात घेता शासनाने रिक्त पदे भरण्याबाबत तावडतोब आदेश निर्गमित करावे.

**१३.८** दिनांक ३ डिसेंबर २००८ रोजी सन २००६ च्या याचिका क्रमांक २२१६ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या परिच्छेद 8(a) मध्ये पुढीलप्रमाणे आदेश नमूद आहेत :- **"The calender to fill in the future vacancies in the posts of lecturer, associate professor, professor and principal is prepared and followed** so that within a period of three months (if the post is required to be filled in by promotion) and within six months ( if the post is required to be fill in by nomination) these vacancies are filled in."

**१३.९** उक्त प्रकरणी निर्णय देतांना मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये शासनाने आपल्या वकीलामार्फत तेथे काय मान्य केले होते ते मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयातच नमूद आहे. "We have heard learned counsel appearing for the State, who agreed that appropriate steps are being taken to fill up the posts."

**१३.१०** दिनांक ५ जून २०१८ रोजी सन २०१८ च्या याचिका क्रमांक १९८९ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर जी सुनावणी झाली त्या सुनावणीमध्ये निरनिराळ्या पक्षांची मांडणी त्या दिवशीच्या खंडपीठाच्या आदेशपत्रात नोंदविली गेली.

**१३.११** शासनाच्या अधिवक्त्याचे म्हणणे आदेशपत्रात नमूद आहे. ते असे की, "According to him, the **staffing pattern is to be examined by the State Government** and thereafter appropriate permission can be given."

*तात्काळ / ई-मेलद्वारे*

## *महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,*

क्रमांक :- न्यायाप्र-२०१३/प्र.क्र.३५७/१३/विशि-१ : मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

**दिनांक :- ८ ऑक्टोबर, २०१८**

**बैठकीचा विषय :-** मा. मंत्री (उ.व.तं.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १० मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये गठीत राज्यस्तरावरील तक्रार निवारण समितीच्या दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्ताबाबत.

**संदर्भ** :- (१) शासनाचे समक्रमांकाचे दि. २६ सप्टेंबर, २०१८ चे पत्र.

महोदय,

मा. मंत्री (उ.व.तं.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १० मार्च, २०१६ च्या शासन निर्णयान्वये गठित राज्यस्तरावरील तक्रार निवारण समितीची दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी पार पडलेल्या बैठकीचे सुधारित इतिवृत्त आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,
**(विजय साबळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

सहपत्र :- वरीलप्रमाणे.

प्रत :- आवश्यक त्या कार्यवाहीसाठी (१) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई (२) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) समितीचे उपाध्यक्ष, यांचे खाजगी सचिव (३) अ.मु.स. (सेवा/सा.प्र.वि.) समितीचे सदस्य (४) प्रधान सचिव (वित्त विभाग) समितीचे सदस्य (५) प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग) समितीचे सदस्य (६) सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) समितीचे सदस्य (७) सहसचिव/उप सचिव (विशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, समितीचे सदस्य (८) उप सचिव (मशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग (९) उपसचिव (तांशि), उच्च व तंत्र शिक्षण (१०) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे (११) कुलगुरू, सर्व अकृषि विद्यापीठे - समितीचे सदस्य (१२) अध्यक्ष, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ युनिर्व्हसिटी ॲण्ड कॉलेज टिचर्स ऑर्गनायझेशन (एमफुक्टो), विद्यापीठ विद्यार्थी भवन, "बी" रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२० (१३) अध्यक्ष, अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षणिक महासंघ (ABRSM) पुणे (१४) निवड नस्ती (विशि-१)

उच्च व तंत्र शिक्षण विभाग/विशि-१

मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १० मार्च, २०१६ अन्वये गठीत राज्यस्तरीय तक्रार समितीच्या दि. २५.०९.२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

**उपस्थितांची यादी :-** (१) बाळाराम द. पाटील, विधानपरिषद सदस्य (२) दत्तात्रय अ. सावंत, विधानपरिषद सदस्य (३) श्री. श्रीकांत देशपांडे, विधानपरिषद सदस्य (४) श्री. सीताराम कुंटे, अपर मुख्य सचिव, सेवा, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय (५) श्री. राजीव कु. मित्तल, सचिव, व्यय, वित्त विभाग, मंत्रालय (६) श्री. सौरभ विजय, सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय (७) श्री. सिद्धार्थ खरात, सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय (८) श्रीम. रोहिणी भालेकर, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय (९) डॉ. धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे, मंत्रालय (१०) श्री. विजय साबळे, अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय (११) डॉ. वैभव एकनाथ नरवडे, अध्यक्ष मुंबई युनिर्व्हसिटी ॲण्ड कॉलेज टिचर्स असो, (MUCTA) (१२) प्रा. प्रदीप दा. खेडकर, अध्यक्ष, अमरावती विद्यापीठ शिक्षण मंच (१३) प्रा. शेखर चंद्रात्रे, सचिव, ABRSM, महाराष्ट्र (१४) डॉ. अनिल कुलकर्णी, अध्यक्ष, ABRSM, महाराष्ट्र (१५) प्रा. दिनेश सुर्यवंशी, उपाध्यक्ष, ABRSM, महाराष्ट्र (१६) डॉ. नितिन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे (१७) डॉ. मुरलीधर चांदेकर, कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती (१८) डॉ. सिद्धार्थ विनायक काणे, कुलगुरू, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर (१९) प्रा. शशीकला वंजारी, कुलगुरू, श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई (२०) श्री. सुहास पेडणेकर, कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई (२१) डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (२२) डॉ. रवि एन. सरोदे, संचालक - परिक्षा व मु. मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड (२३) प्रा. तपती मुखोपाध्याय, अध्यक्ष, महाराष्ट्र महासंघ (२४) प्रा. एस. पी. लवांडे, सरचिटणीस, महाराष्ट्र महासंघ (२५) प्रा. बी. टी. देशमुख, सदस्य, महाराष्ट्र महासंघ (२६) प्रा. पी. बी. रघुवंशी, सदस्य, महाराष्ट्र महासंघ (२७) प्रा. आर. एच. पाटीस, सदस्य, महाराष्ट्र महासंघ (२८) प्रा. एस. एस. सोनावणे, सदस्य, महाराष्ट्र महासंघ (२९) प्रा. एस. के. आवताडे, सदस्य, महाराष्ट्र महासंघ (३०) प्रा. मधु परांजपे, सदस्य, महाराष्ट्र महासंघ (३१) प्रा. एस. के. पवार, सदस्य, महाराष्ट्र महासंघ (३२) प्रा. एस. एम. जोगदंड, सदस्य, महाराष्ट्र महासंघ

**१३.१२** या सर्व पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मा. खंडपीठाने त्यादिवशी आपले जे प्रथम दर्शनी मत नोंदविले ते पुढीलप्रमाणे :- "6. **Prima facie, the situation appears to be prevailing since long and nobody has taken timely action to resolve it.** The parties before this Court could have attempted to resolve the situation well in advance instead of barring admission at eleventh hour i.e. in the month of June 2018."

**१३.१३ "नवीन पदनिर्मिती हे आदेश निघाल्यापासून पूर्ण बंद राहील"** असे आदेश दिनांक २ जून रोजी काढल्यानंतर **अनेक 'श्रीमंत' विभागांनी त्यातून आपली सुटका करून घेण्यात यश मिळविले. उदा. सिडको, एमएमआरडीए, पीएमआरडीए इत्यादी सारख्या संस्थांना हे आदेश लागू राहणार नाहीत** असा स्पष्ट उल्लेख करण्यात आला. **"नवीन पदनिर्मिती हे आदेश निघाल्यापासून पूर्णपणे बंद राहील"** हे बंधन उच्च शिक्षण विभागाने आपल्या गळ्यात अडकवून घेतांनाच रिक्त झालेली पदे भरण्यावर सुद्धा अनेक बंधने त्या विभागाने आपल्या गळ्याच अडकवून घेतली.

**१३.१४** २३ सप्टेंबर २०१५ च्या शासननिर्णयाने **विक्रीकर विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग, मुद्रांक शुल्क व नोंदणी विभाग, महसूल विभाग व परिवहन शुल्क विभाग यासारख्या 'लठ्ठेदार' विभागांना नवीन पदनिर्मिती व रिक्त पदे भरण्याच्या निर्बंधामधून वगळण्याची सवलत देण्यात आली. उच्च शिक्षण विभागाला मात्र वंचित ठेवले जात आहे.**

**१३.१५** या चर्चेत सत्ताधारी पक्षाच्या शिक्षक संघटनेच्या एका नेत्याने "४० टक्के जागा भरण्याचा निर्णय शासनाने घेतला" असे सांगितले असता महासंघाच्या वतीने "ती फक्त वृत्तपत्रात आलेली बातमी आहे" असे नमूद करण्यात आले, तेव्हा खुद्द मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी "मी सुद्धा ती बातमी वृत्तपत्रातच वाचली आहे" असे नमूद केले व "आम्ही प्रयत्न करीत आहोत व ६० ते ८० टक्क्यांपर्यंत जागा भरता याव्यात असा आमचा प्रयत्न आहे" असे सांगितले. इतिवृत्तात मात्र ते आले नाही. काय आले त्यासाठी इतिवृत्त पहा.

**१४.** मागणी क्रमांक **दोन बाबत**, विषय काय होता? मा. मंत्री यांचे निर्देश काय आहेत? महासंघातर्फे काय बाजू मांडण्यात आली होती याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत.

**अ.क्र.** : २,

**विषय** :- ७१ दिवसांच्या संप काळातील थकीत वेतन मिळावे.

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- विभागाने **यासंदर्भात वस्तुस्थितीदर्शक प्रस्ताव तयार करून वित्त विभागाकडे सादर करण्याची कार्यवाही करावी.**

**महासंघातर्फे मांडण्यात आलेली बाजू :-**

**१४.१** मा. शिक्षणमंत्र्यांनी अधिकृतपणे शिक्षणमंत्री या नात्याने मांडलेली या विषयातील भूमिका लक्षात घेतली पाहिजे. १ नोव्हेंबर २०१५ रोजी औपचारिक शासकीय बैठकीत केलेल्या भाषणात मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी सन २०१३ मध्ये तत्कालीन शासनाने ७०-७२ दिवसांचा शिक्षकांचा जो पगार रोखून ठेवला तो फालतूपणाचा निर्णय होता, एवढेच सांगितले नाही तर पुढे जाऊन असेही सांगितले की, शेवटी परीक्षेचे काम त्या शिक्षकांनीच केले ना? तरी त्यांचा पगार देणार नाही हे चिटींग असल्याचे त्यांनी जाहीर केले. शब्दशः पुढील शब्दातः-

(१) **"त्याचबरोबर No work No pay वगैरे हे असले फालतू निर्णय जे**

---

मूळ इतिवृत्तात मजकूर स्तंभ १ : अ.क्र. स्तंभ २ : विषय, स्तंभ ३ : मा.मंत्री यांचे निर्देश, असा एका तक्त्यात दिलेला आहे. इथे तो मजकूर शब्दशः धावत्या मजकुराच्या स्वरूपात दिलेला आहे. - संपादक

अ.क्र. :-

विषय :-

मा. मंत्री यांचे निर्देश :-

**(१) विषय :- प्राध्यापक भरतीवरील बंदी उठवून भरती प्रक्रिया सुरू करावी.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- प्राध्यापक भरतीवरील बंदी उठविण्याबाबत शासनाच्या उच्चाधिकार समितीनेही सहमती दिली असून याबाबत शिक्षकेत्तरची १०० टक्के पदे भरण्यास परवानगी दिली असून शिक्षकीय संवर्गाची ६० टक्के पदे भरायाला उच्च शिक्षण विभाग परवानगी मागत असून उरलेली ४० टक्के पदे तासिका तत्वावर भरण्यास तूर्त अनुमती मिळावी, ही तासिका तत्वावरील पदे भरतांना प्रत्येक अध्यापकास किमान १५ ते २० हजार मिळतील असे मानधन ठरविण्यात यावे. पुढील काळात ही पदे भरण्यात यावीत.

**(२) विषय :- ७१ दिवसांच्या संप काळातील थकीत वेतन मिळावे.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- ७१ दिवसांच्या संप काळातील थकीत वेतनाबाबत वस्तुस्थिती दर्शक प्रस्ताव याचा अर्थ अध्यापकांनी परिक्षा काळातील काम हे उशीरा का होईना पण पूर्ण केले असून त्याला मा. सर्वोच्च न्यायालयाचे No work no pay हे निर्देश लागू होत नाहीत. तरी याबाबत विभागाकडून वित्त विभागाला परत गेलेली रक्कम विभागाला परत मिळावी जेणेकरून ७१ दिवसांच्या संप काळातील थकीत वेतन अध्यापकांना देण्यात येईल.

**(३) विषय :- सातवा वेतन आयोग लागू करावा.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- राज्यशासकीय कर्मचाऱ्यांसोबतच विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यात येईल. ७ व्या वेतन आयोगाअंतर्गत केंद्र सरकार जी ५०% थकबाकी देणार असेल तर त्यासाठी उच्च शिक्षण विभागामार्फत विशेष कक्ष उभारून जानेवारी, २०१९ पूर्वी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून केंद्रशासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल जेणेकरून त्यांच्याकडून आलेली थकबाकी प्राध्यापकांना अदा केली जाईल.

**(४) विषय :- जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करावी.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- सन २००५ पासून राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू केलेली आहे. त्यामुळे सन २००५ पासून पुढे नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करता येणार नाही. तसेच नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू असलेल्या कर्मचाऱ्यांना DCPS क्रमांक दिले आहेत याची खातरजमा करावी व त्यानुषंगाने होणारी कपातीबाबतची माहिती कर्मचाऱ्यांना मिळेल यासंदर्भात संचालक, उच्च शिक्षण यांच्या स्तरावर आढावा घ्यावा.

**(५) विषय :- विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील सेवकांसाठी वेतन व्यवस्था निर्माण करावी.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- याबाबत तपासणी करून विभागाने त्यावर योग्य ती कार्यवाही करावी. शुल्क नियंत्रण समितीद्वारा रचना उभी करावी, सदर रचना अशी असावी की, ज्यात संस्थेने प्राध्यापकांना ऑनलाईन वेतन दिले असल्याचे शुल्क नियंत्रण समितीला खात्री होऊ शकेल व त्या आधारे शुल्क नियंत्रण समिती त्या त्या महाविद्यालयातील शुल्क ठरवेल.

**(६) विषय :- विनाअनुदानित महाविद्यालय/विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित व पूर्ण वेतन मिळावे.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- याबाबत तपासणी करून विभागाने त्यावर योग्य ती कार्यवाही करावी.

**(७) विषय :- मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व्यथा निवारण समिती स्थापित करावी.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- यासंदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. १३२६/२०१२ मध्ये दिलेल्या आदेशानुसार शिक्षक व शिक्षक संघटना यांच्या मागण्या/समस्या/तक्रारीवर निर्णय घेण्यासाठी दि. १०.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरावर विशेष समिती गठीत करण्यात आलेली आहे.

**(८) विषय :- विद्यापीठातील नॉमिनेशनचा धुमाकूळ कमी करण्यासाठी उपाययोजना करावी.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदी विधानमंडळाच्या संयुक्त समितीच्या शिफारशीनुसार करण्यात आलेल्या आहेत. तथापि, याबाबत तपासणी करून ज्या विद्यापीठात चुकीच्या नेमणुका झाल्या आहेत त्या दुरुस्त कराव्यात.

**(९) विषय :- सहाव्या वेतन आयोगातील त्रुटी दूर करणे.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- Ph.D वेतनवाढीमुळे स्टेपअप संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे उच्च शिक्षण विभागामार्फत वित्त विभागाला प्रस्ताव सादर करेल.

**(१०) विषय :- तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधनात सुधारणा करण्याबाबत.**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर सुधारित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून या संदर्भातील शासन निर्णय लवकरच निर्गमित होईल.

वरील बाबींची स्पष्टता पाहता शिक्षक संघटनांचे समाधान होईल. विद्यार्थी हित लक्षात घेता शिक्षकांनी संप मागे घेण्याबाबत मा. मंत्री महोदयांनी शासनातर्फे आवाहन केले. लोकशाही मध्ये आंदोलन करण्याचा अधिकार आहे, पण विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून योग्य निर्णय घेतल्यास शासनही प्राध्यापकांचे नुकसान होऊ देणार नाही असे मा. मंत्री महोदयांनी शिक्षक संघटनांना आश्वासित केले.

वरील सर्व विषयांवर चर्चा होऊन बैठक समाप्त झाली.

**आहेत ना, म्हणजे हे कसे रडीचा डाव. म्हणजे त्यावेळी तुम्ही मला त्रास दिला आता मी तुम्हाला त्रास देतो आणि त्यामुळे नंतर तुम्ही प्राध्यापकांकडून काम करून घेतलचं ना? रिझल्ट नंतर लावलेचं ना? पेपर तपासून घेतलेच की नाही? पण त्या दिवसांचा पगार देणार नाही वगैरे ही कुठली चिटींग आहे?"**

(२) **"हे खरं आहे की, याला केवळ प्राध्यापक संघटना जबाबदार नाही आहे. प्राध्यापकांच्या मागण्या वेळेवर न ऐकणारं सरकार हे सुद्धा तितकेच जबाबदार, आम्ही त्यात आहोतच."**

(३) **"या विषयाची माझी भूमिका स्पष्ट आहे. परीक्षांवर बहिष्कार हे महाराष्ट्रात बंदच झालं पाहिजे. प्राध्यापकांच्या मागण्या सरकारने वेळेत ऐकल्या पाहिजेत, त्या वेळेत सोडवल्या पाहिजेत."**

त्यांच्या उपरोक्त भाषणाची दृकश्राव्य प्रत संघटनेच्या कार्यालयात उपलब्ध असून गरज पडल्यास मा. मंत्रिमहोदयांना ती उपलब्ध करून देण्याची संघटनेची तयारी आहे.

**१४.२** सहाव्या वेतन आयोगाच्या वेळी फक्त १४ राज्यांना केंद्रशासनाचे पूर्ण अर्थसहाय्य मिळू शकले ही वस्तुस्थिती राज्यसभेत स्पष्ट झालेली असतांना त्यावेळी महाराष्ट्रामध्ये या महासंघाने दाखल केलेल्या शपथपत्रानंतर मा. उच्च न्यायालयाने दिनांक १० मे २०१३ रोजी दिलेल्या निर्णयामुळे केंद्रशासनाचे अर्थसहाय्य मिळू शकले. हा ऐतिहासिक घटनाक्रम महाराष्ट्रातील शिक्षक विसरू शकत नाहीत.

**१४.३** या प्रश्नावरील चर्चा संपत आली असतांना शिक्षणमंत्री स्वतः "मंत्री म्हणून मी ही मागणी खात्याच्या वतीने मान्य करीत आहे. ती आता वित्त विभागाकडे सहमतीसाठी पाठविण्यात येईल" असे नमूद केले. इतकेच नव्हेतर सभेत उपस्थित असलेल्या तीन शिक्षक आमदारांना उद्देशून "हे तीन विधानपरिषद सदस्य वित्त विभागाची मान्यता मिळविण्यासाठी मला मदत करतील" असे उद्‍गार काढले. त्यांच्या पक्षांच्या शिक्षक नेत्यांनी ही मागणी मान्य झाल्याचे बाहेर सर्वत्र सांगितले. प्रत्यक्ष इतिवृत्तात मात्र "वस्तुस्थिती दर्शक प्रस्ताव" उच्च शिक्षण विभाग तयार करून तो वित्त विभागाकडे सादर करील. असे नमूद करण्यात आलेले आहे. त्या प्रस्तावातून "वस्तुस्थिती दर्शक काय दर्शन" घडेल हे अर्थातच मोघम ठेवण्यात आले आहे.

**१५.** मागणी क्रमांक **तीन बाबत**, विषय काय होता? मा. मंत्री यांचे निर्देश काय आहेत? महासंघातर्फे काय बाजू मांडण्यात आली होती याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहेत.

**अ.क्र.** : ३,

**विषय** :- सातवा वेतन आयोग लागू करावा.

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- राज्यशासकीय कर्मचारी यांच्यासोबतच विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना सातवा वेतन आयोग लागू होईल.

IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY : CIVIL APPELLATE JURISDICTION

**WRIT PETITION NO. 13166 OF 2017**

Shri Maruti Dattatraya Patil..Petitioner Vs. The State of Maharashtra and ors...Respondents

Mr.Prashant Bhavake, for the Petitioner. Mr.S.B.Kalel, AGP for Respondents No. 1, 3, 5 & 6 - State. Mrs.Lata Patne a/w Mr.Vinod Joshi, for Respondent No.2. Mr.U.H.Pawar, for Respondents No. 7 & 8.

## CORAM : B.R.GAVAI & M.S.KARNIK, JJ.
## DATE : 03rd OCTOBER, 2018
## ORAL JUDGMENT (PER B.R.GAVAI, J.) :

. Rule. Rule is made returnable forthwith. Heard by consent.

**2.** The Petitioner has approached this Court being aggrieved by the order dated 17/04/2017 passed by the Respondent No.3 whereby it is held that the Petitioner is not entitled to the pensionary benefits.

The facts in brief giving rise to the present Petition are as under :

**3.** The Petitioner was appointed as a Junior Clerk with one Mahatma Phule High School which is under the management of Respondent No.7 on 10/06/1971. From time to time, the Petitioner was promoted to the promotional posts. On 07/12/1998, Respondent No. 7 issued an advertisement to fill up certain posts. The Petitioner applied in response to the said advertisement for full-time lecturer in Education. The Petitioner came to be appointed as a full-time lecturer in the Respondent No. 8 - college under the management of Respondent No. 7 on 20/09/1999. The Petitioner got superannuated on 30/09/2012.

**4.** However, since the proposal for grant of pensionary benefits to the Petitioner was not forwarded by Respondent No.4, the Petitioner approached this Court by way of Civil Writ Petition No. 1411 of 2014. Vide judgment and order dated 16/04/2015, the Division Bench of this Court directed the Respondents to consider the case of the Petitioner for grant of pensionary benefits in accordance with law. Thereafter again the Respondent No.2 returned and rejected the proposal vide order dated 14/12/2015. The Petitioner was therefore required to approach this Court by way of Writ Petition No. 727 of 2017. Vide the judgment and order dated 09/03/2017, this Court directed to reconsider the claim of the Petitioner. By the impugned order, the claim has been again rejected.

**5.** The perusal of the impugned order would reveal that the claim of the Petitioner has been rejected on the ground that the appointment of the Petitioner from 1999 was ad-hoc since the Petitioner did not possess the requisite qualification. The other reason given is that the **Government Resolution vide which the requirement of having passed net-set examination is exempted has been issued on 27/06/2013 and the Petitioner has retired on 30/09/2012 i.e. prior to the said G.R. coming into effect.**

**6.** We find that the contention raised on behalf of the Respondents are wholly untenable. Undisputedly, the **Petitioner when he was appointed in 1999 was possessing the requisite qualification except the net-set examination.** Not only this but the Petitioner's appointment was already approved by the Competent Authority and as such requisite scale was made applicable to the Petitioner till his retirement.

**7.** Taking into consideration the difficulties of various lecturers being appointed but were not possessing the net-set examination, the Government has come out with the resolution dated 27/06/2013. It will be relevant to refer to translated part of the said G.R. which reads as under :

*Government Resolution :-*

*14. Considering the facts mentioned in the preface, the notification dt. 19.9.1991 of the University Grant Commission was made applicable in the state under a Govt. Resolution dt. 23.10.1992. Therefore, the provisions of the said Government Resolution cannot be made applicable with retrospective effect i.e. from the date 19.9.1991. Hence, the qualifications mentioned in the notification dt. 19.9.1991 of the University Grant Commission shall not be applicable to the lecturers appointed prior to the date 23.10.1992.*

*15. The Government hereby grants approval to hold the services of those non-Net/Set teachers, appointed during the period from the date 23.10.1992 to 3.4.2000, who during their service period, have not acquired the educational qualification / eligibility (Net/Set/Ph.D./M.Phil.) prescribed for the post of lecturer, by the University Grant Commission, valid for all purposes, from the date of issuance of said Government Resolution, subject to following*

**महासंघातर्फे मांडण्यात आलेली बाजू :-**

**१५.१** सातव्या वेतन आयोगाच्या संदर्भात मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी चर्चेच्या वेळी शासकीय कर्मचाऱ्यांशी समतुल्यतेबाबतचे विचार वेगवेगळ्या शब्दात मांडले. इतिवृत्तामध्ये त्यांचे निर्देश म्हणून जे मांडण्यात आले आहे ते लक्षात घेता महासंघाची याबाबतची भूमिका स्पष्टपणे मांडण्यात आली व ती जाहीरपणे मांडणे आवश्यक वाटते.

**१५.२** राज्यशासकीय कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष जेव्हा सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन अदा करण्यात येईल त्यावेळीच व त्यासोबत विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना ते अदा करण्यात येईल व यावे या भूमिकेला महासंघाचा पाठिंबा आहे. हे ठामपणे नमूद करण्यात येत आहे.

**१५.३** इतर कोणत्याही वर्गासाठी मिळत नाही पण विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनवाढीच्या रकमेच्या ५० टक्के अनुदान केंद्रशासनाकडून मिळत असल्यामुळे राज्यशासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत जसा शासननिर्णय निर्गमित झाला तसो तो या ही बाबतीत निर्गमित होणे आवश्यक आहे. त्याशिवाय थकबाकी अदा करण्याची प्रक्रिया सुरू होऊ शकत नाही.

**१५.४** *केंद्रशासनाने मान्य केलेली सातव्या वेतन आयोगाशी समकक्ष वेतनश्रेण्यांची योजना समग्र योजना म्हणून अंमलात आणली तरच ५० टक्केचा परतावा मिळू शकेल हे लक्षात ठेवून याबाबतचा शासननिर्णय निर्गमित करावा लागेल.* शासकीय कर्मचाऱ्यांसाठी काढलेल्या शासननिर्णयाप्रमाणे या शासननिर्णयातसुद्धा प्रत्यक्ष अदायगीची तारीख वेगळी नमूद करता येईल.

**१५.५** सहाव्या वेतन आयोगाच्यावेळी थकबाकी मिळविण्याबाबतची प्रक्रिया ज्यांनी पूर्ण केली त्या १४ राज्यांना पूर्ण थकबाकी केंद्र शासनाने अदा केली. उर्वरित १५ राज्यांना ही थकबाकी पूर्णपणे मिळू शकली नाही ही बाब राज्यसभेत तारांकित प्रश्न क्रमांक २४१ ला दिलेल्या उत्तरामध्ये स्पष्ट झालेली आहे. ***थकबाकी अदा करतांना ५० टक्के शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे व ५० टक्के रोखीने अदा केल्यासच केंद्राकडून परतावा मिळू शकेल हे लक्षात ठेवावे लागेल.***

**१६.** मागणी क्रमांक **चार बाबत**, विषय काय होता? मा. मंत्री यांचे निर्देश काय आहेत? महासंघातर्फे काय बाजू मांडण्यात आली होती याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**अ.क्र.** : ४,

**विषय** :- जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करावी.

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- सन २००५ पासून राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू केलेली आहे. त्यामुळे सन २००५ पासून पुढे नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करता येणार नाही.

तसेच नवीन परिभाषित अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू असलेल्या

*conditions.*

*(A) The appointment of the concerned teacher should have been made on regular basis :-*

*(B) The appointment of the concerned teacher should have been made by complying with all the procedures prescribed.*

*(C) The approval to appointment of concerned teacher should have been granted by the University, by making compliance of all other prescribed qualifications and conditions, except the condition of Net / Set qualification.*

*(D) The proposal of the concerned teacher should have been submitted by the University, for the approval of University Grant Commission.*

*16. The concerned Divisional Jt. Director, Higher Education, should set up a committee under his chairmanship, for checking the cases of teachers, appointed during the period from the dt. 23.10.1992 to the dt. 03.04.2000, on merit. The said scrutiny committee should scrupulously check all the aspects as to whether all the procedure, right from the advertisement for selection of the concerned teachers up to their appointment orders has been followed as per the rules or else, as well as whether the said posts have fallen vacant, compliance of social reservation has been made and other similar aspects and should submit the self explanatory report to that effect to the Director, Higher Education, Maharashtra State, Pune and thereafter final approval should be granted on the Director level.*

*17. Moreover, if the teachers, appointed during the aforesaid period, have already been given appointment to the post of principal or similar post by holding their earlier service valid, their appointment and the increments admissible as per the existing rules as well as the salary being paid in accordance therewith, shall remain unaffected and separate orders shall be issued as regards these two points.*

*18. As the decision has been taken to hold the services of said teachers valid for all the purposes, from the date of issuance of this Government Resolution, the new* ***Defined Contributory Pension Scheme shall be applicable to these teachers from the date of issuance of this Govt. Resolution.***

*19. This Government Resolution is being issued with the concurrence of Finance Department, General Administration Department and Law and Judiciary Department, given under their unofficial reference Nos. - URN-85/ 13/ Service-4, dt. 17 June 2013, URN. 873/2012/Twelve, dt. 22.5.2012 and URN 399- 2012-E, dated 22 May 2012, respectively.*

**8.** It can be thus seen that vide aforesaid G.R., the State Government has exempted the lecturers who are appointed between 23/10/1992 to 03/04/2000 and who were not possessing the net-set examination, M.Phil. and Ph.D.qualification. Only requirement is that the appointment of these lecturers is required to be made after following due selection process. The other requirement is that appointment of such lecturers ought to have been approved by the University and University should have submitted the proposal for grant of approval of such teachers to the University Grant Commission.

**9.** Undisputedly, the Petitioners' appointment was made after following due selection process. Not only University as well as the Respondent -Joint Director of Education had also granted approval to the appointment of the Petitioner. As such, it can be clearly seen that the Petitioner is entitled to the benefits of the said G.R. **Undisputedly, the Petitioner's date of appointment is 20/9/1999 i.e. the date which falls between 23/10/1992 to 03/04/2000.**

**10.** The reason which is given that since G.R. is issued on 27/06/2013 and the Petitioner has retired prior to the coming into force of the said G.R. is also absolutely untenable. G.R. provides for grant of protection to the employees who are appointed between the aforesaid two dates. Merely because the Petitioner has superannuated prior to the date of the said Government Resolution cannot be a ground to deny the pension to the Petitioner to which the Petitioner is otherwise entitled in accordance with the said G.R. We are therefore of the considered view that the impugned order dated 17/04/2017 is not sustainable. Hence, the following order.

**ORDER**

(i) The impugned order dated 17/04/2017 is quashed and set aside.

(ii) The Respondents are directed to make the pension applicable to the Petitioner on the basis of his last drawn salary.

(iii) The pension is to be paid to the Petitioner from the month of November 2018. All the arrears between the date of superannuation till 31/10/2018 shall be cleared within a period of 3 months from today.

**11.** Needless to state that while making pensionary scheme applicable, the date of the appointment of the Petitioner shall be construed as 20/09/1999.

**12.** The Writ Petition is disposed of in the aforesaid terms.

**(M.S.KARNIK, J.)** **(B.R.GAVAI, J.)**

कर्मचाऱ्यांना DCPS क्रमांक दिले आहेत याची खातरजमा करावी व त्यानुषंगाने होणारी कपातीबाबतची माहिती कर्मचाऱ्यांना मिळेल यासंदर्भात संचालक, उच्च शिक्षण यांच्या स्तरावर आढावा घ्यावा.

**महासंघातर्फे मांडण्यात आलेली बाजू :-**

**१६.१** याबाबतीत मंत्रिमहोदय लेखी निवेदनातून सादर करण्यात आलेल्या मुद्यांवर कोणतीही चर्चा करण्याच्या तयारीत नव्हते. त्यांनी त्यांचे मत निर्देशात नमूद केले.

**१७.** मागणी क्रमांक **पाच बाबत,** विषय काय होता? मा. मंत्री यांचे निर्देश काय आहेत? महासंघातर्फे काय बाजू मांडण्यात आली होती याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**अ.क्र.** : ५,

**विषय :-** विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील सेवकांसाठी वेतन व्यवस्था निर्माण करावी.

**मा. मंत्री यांचे निर्देश :-** याबाबत तपासणी करून विभागाने त्यावर योग्य ती कार्यवाही करावी. शुल्क नियंत्रण समितीद्वारा रचना उभी करावी.

**महासंघातर्फे मांडण्यात आलेली बाजू :-**

*महाराष्ट्र शासन*

**विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**
**राजाराम महाविद्यालय, परिसर, विद्यानगर,**
**कोल्हापूर - ४१६ ००४**
E-mail : jdhekop@rediffmail.com
फोन क्र. : (०२३१) २५३५४००, २५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००

जा. क्र. : विसस/उशि/कोवि/२०१८/४०४५

**दिनांक : १० ऑक्टोबर २०१८**

प्रति,

प्राचार्य,

सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालये, कोल्हापूर विभाग, जिल्हा - कोल्हापूर/सांगली/सातारा.

**विषय :-** ऑनलाईन व ऑफलाईन वेतन अनुदान जमा करणेबाबत. माहे सप्टेंबर - २०१८ वेतन अनुदान.

**संदर्भ :-** (१) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५.०९.२०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

(२) शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा), यांचे पत्र दि. १०.०८.२०१८ व त्यानुसार चर्चा दि. १०.१०.२०१८.

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली दि. २५.९.२०१८ रोजी **झालेल्या बैठकीमध्ये विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून योग्य तो निर्णय घेतल्यास शासनही प्राध्यपकांचे नुकसान होऊ देणार नाही, असे मा. मंत्री महोदयांनी शिक्षक संघटनांना आश्वासित केले.**

उपरोक्त संदर्भ क्र. २ च्या पत्रानुसार विभागीय सहसंचालक कार्यालय, कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांच्या शिष्टमंडळासमवेत झालेल्या चर्चेमध्ये विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन तसेच विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही या दृष्टीने बेमुदत काम बंद आंदोलनापासून परावृत्त व्हावे असे आवाहन या कार्यालयामार्फत शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाच्या शिष्टमंडळास करण्यात आले.

याद्वारे आपणांस सूचित करण्यात येते की, शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ (सुटा) यांच्या उपरोक्त संदर्भिय दि. १०.१०.२०१८ रोजीच्या पत्राच्या अधिन राहून व भविष्यात शासन जो निर्णय घेईल तो संबंधितांना बंधनकारक राहील या व सेवाशर्तीच्या विहीत अटींच्या अधिन राहून **आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांचे माहे सप्टेंबर २०१८ मधील बेमुदत काम बंद आंदोलनाच्या कालावधीतील वेतन अदा करण्यात यावे.**

(डॉ. अजय साळी)
विभागीय सहसंचालक (उ.शि.)
कोल्हापूर विभाग, कोल्हापूर

प्रत :- (१) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर (२) वेतन व भ.नि.नि. पथक प्रस्तुत कार्यालय.

**१७.१** मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सन २००२ च्या याचिका क्रमांक ३३३ मध्ये दिनांक २९ डिसेंबर २००३ रोजी अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांप्रमाणे सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या विनाअनुदानित इंजिनिअरींग महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुद्धा द्याव्या लागतील असा निर्णय दिला. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या या निर्णयाविरूद्ध व्यवस्थापकांनी केलेले अपिल मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५ जानेवारी २०१७ रोजी एक ९० परिच्छेदांचा तपशीलवार निर्णय देऊन फेटाळून लावले.

**१७.२** सर्व बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने याबाबतीत जो निर्णय दिला तो परिच्छेद ७२ मध्ये नमूद असून तो परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे :-

"72. The colleges run by the appellants are admittedly colleges affiliated to the Universities functioning under the Act. **Therefore, their teaching staff would be entitled to the revised pay scales in terms of the G.R. dated 12.08.2009."**

**१७.३** दिनांक ३१ ऑक्टोबर २००२ रोजी ३१७/१९९३ या प्रकरणात मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निर्णय व त्याचबरोबर सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५ जानेवारी २०१७ रोजी सिव्हिल अपिल क्रमांक. ११५-११६ ऑफ २०१७ या प्रकरणामध्ये दिलेला निर्णय लक्षात घेता महाराष्ट्र विना अनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था अधिनियम २०१५ या कायद्यान्वये निर्माण केलेले **'प्रवेश नियामक प्राधिकरण'** व **'शुल्क नियामक प्राधिकरण'** या दोन प्राधिकरणांच्या सोबतच या कायद्यामध्ये दुरुस्ती करून **'वेतन नियामक प्राधिकरण'** निर्माण करण्यात यावे. या सर्वच मागण्यांबाबत "विभागाने तपासणी करून योग्य ती कार्यवाही करावी" असे निर्देश दिले.

शासननिर्णय निर्गमित होतांना सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय उधृत करून तो विनाअनुदानित इंजिनिअरिंग महाविद्यालयांनासुद्धा लागू असेल असा उल्लेख त्यामध्ये असावा ही साधी मागणीसुद्धा मा. मंत्रिमहोदय मान्य करू शकले नाही.

**१८.** मागणी क्रमांक **सहा बाबत,** विषय काय होता? मा. मंत्री यांचे निर्देश काय आहेत? महासंघातर्फे काय बाजू मांडण्यात आली होती याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**अ.क्र.** : ६,

**विषय :-** विनाअनुदानित महाविद्यालये/विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित व पूर्ण वेतन मिळावे.

**मा. मंत्री यांचे निर्देश :-** याबाबत तपासणी करून विभागाने त्यावर योग्य ती कार्यवाही करावी.

**महासंघातर्फे मांडण्यात आलेली बाजू :-**

**१८.१** सादर केलेल्या निवेदनाप्रमाणे.

**१९.** मागणी क्रमांक **सात बाबत,** विषय काय होता? मा. मंत्री यांचे निर्देश काय आहेत? महासंघातर्फे काय बाजू मांडण्यात आली होती याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**अ.क्र.** : ७,

**विषय :-** मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व्यथा निवारण समिती स्थापित करावी.

**मा. मंत्री यांचे निर्देश :-** यासंदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. १३२६/२०१२ मध्ये दिलेल्या आदेशानुसार शिक्षक व शिक्षक संघटना यांच्या मागण्या/समस्या/तक्रारीवर निर्णय घेण्यासाठी दि. १०.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरावर विशेष समिती गठीत करण्यात आलेली आहे.

**महासंघातर्फे मांडण्यात आलेली बाजू :-**

**१९.१** मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व्यथा निवारण यंत्रणा स्थापित करण्यात यावी याबाबतीत लेखी निवेदनात देण्यात आलेली माहिती सादर करण्यात आली.

**२०.** मागणी क्रमांक **आठ बाबत,** विषय काय होता? मा. मंत्री यांचे निर्देश काय आहेत? महासंघातर्फे काय बाजू मांडण्यात आली होती याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**अ.क्र.** : ८,

**विषय :-** विद्यापीठातील नॉमिनेशनचा धुमाकूळ कमी करण्यासाठी उपाययोजना करावी.

**मा. मंत्री यांचे निर्देश :-** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदी विधानमंडळाच्या संयुक्त समितीच्या शिफारशीनुसार करण्यात आलेल्या आहेत. तथापि, याबाबत तपासणी करून ज्या विद्यापीठात चुकीच्या नेमणुका झाल्या आहेत त्या दुरुस्त कराव्यात.

**महासंघातर्फे मांडण्यात आलेली बाजू :-**

**२०.१** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार नॉमिनेशन्सच्या धुमाकूळाबाबत सादर करण्यात आलेल्या निवेदनातील मुद्दे सादर करण्यात आले.

**२१.** मागणी क्रमांक **नऊ बाबत,** विषय काय होता? मा. मंत्री यांचे निर्देश काय आहेत? महासंघातर्फे काय बाजू मांडण्यात आली होती याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**अ.क्र.** : ९,

**विषय** :- सहाव्या वेतन आयोगातील त्रुटी दूर करणे.

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- १. पीएच. डी. वेतनवाढी मुळे स्टेप-अप संदर्भात उद्‌भवलेली/होणारी न्यायालयीन प्रकरणे व त्यावर मा. न्यायालयाचे आदेश इ. विचारात घेऊन तसा प्रस्ताव वित्त विभागास सादर करावा.

**महासंघातर्फे मांडण्यात आलेली बाजू :-**

**२१.१** निवेदनाप्रमाणे.

**२२.** मागणी क्रमांक **दहा बाबत,** विषय काय होता? मा. मंत्री यांचे निर्देश काय आहेत? महासंघातर्फे काय बाजू मांडण्यात आली होती याबाबतचे तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**अ.क्र.** : १०,

**विषय** :- तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधनात सुधारणा करण्याबाबत.

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर सुधारित करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून या संदर्भातील शासन निर्णय लवकरच निर्गमित होईल.

**महासंघातर्फे मांडण्यात आलेली बाजू :-**

**२२.१** निवेदनाप्रमाणे.

## भाग : तीन

**२३.** महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या प्रतिनिधी मंडळाने दिनांक २६ सप्टेंबर २०१८ रोजी उच्च शिक्षण विभागाने पाठविलेले इतिवृत्त त्याच दिवशीच्या दुपारच्या बैठकीमध्ये विचारात घेतले. संपूर्ण इतिवृत्ताचे काळजीपूर्वक वाचन केल्यानंतर प्रतिनिधी मंडळाने एकाही प्रश्नाच्या बाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा मला अधिकार नाही ही गोष्ट मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी लिखित स्वरूपात मान्य केलेली असल्यामुळे आंदोलन ठामपणे सुरु राहील असा निर्णय घेतला. मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपाशिवाय परिस्थितीतून मार्ग निघणे अशक्य आहे असाही निर्णय त्यादिवशीच्या बैठकीमध्ये घेतला.

**२४.** जे इतिवृत्त उच्च शिक्षण विभागाने प्रसृत केलेले आहे ते काळजीपूर्वक वाचले तर असे दिसून येते की, त्यामध्ये एकाही मुद्यावर उच्च शिक्षण मंत्र्यांना अंतिम निर्णय घेता आला नाही कारण त्यांनी सर्व मुद्यांच्या बाबतीत **मा.उच्च शिक्षण मंत्र्यांचे निर्देश** असे शब्द वापरलेले आहेत. इतिवृत्तात उच्च शिक्षणमंत्र्यांनी कोणते शब्द वापरावयाचे हा त्यांचा अधिकार असतो, हे खरे असले तरी एक म्हणजे चर्चेत आपण वारंवार जे शब्द वापरले ते शब्द शब्दशः इतिवृत्तात न येणे ही गोष्ट त्या पदाला कमीपणा आणणारी असते व दुसरे म्हणजे त्यांनी जे शब्द वापरले आहे त्यांचा अर्थ हा त्यांच्या हाती नसतो. “निर्देश करणे” या शब्दाचा "make a reference" असा अर्थ महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या “प्रशासन वाक्प्रयोग” (१९६८) या ग्रंथात पृष्ठ २२८ वर नमूद आहे. त्याच ग्रंथाच्या पृष्ठ २९० वर शासननिर्णय अथवा निर्णय म्हणजे काय? हेही नमूद आहे. महाराष्ट्र शासनाच्या भाषा संचालनालयाने प्रसिद्ध केलेल्या “शासन व्यवहार कोष” (मे १९७३) या कोषामध्ये पृष्ठ ४७३ वर निर्देश या शब्दाचा अर्थ "reference" असा सांगितलेला आहे. उच्च शिक्षण मंत्र्यांनी सुपूर्त केलेले संदर्भ म्हणून आता उपरोक्त निर्देश उच्च शिक्षण विभागा मार्फत निरनिराळ्या विभागांमध्ये फिरविण्यात येतील व त्यानंतर जो काय निर्णय व्हायचा तो झाला तर ५ ते १० महिन्यांनी होईल एवढाच त्याचा अर्थ आहे. कारण इतर विभागांवर मुदतीचे बंधन घालण्याचा अधिकार उच्च शिक्षणमंत्र्यांना नाही याची त्यांना जाणीव आहे.

**२५.** खुद्द उच्च शिक्षण विभागाच्या नेत्यांनी आपले दौर्बल्य जाहीरपणे वेशीवर टांगल्यामुळे महाराष्ट्रातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळलेली आहे. सोलापूर येथे १२ ते १५ ऑक्टोबर दरम्यान होऊ घातलेल्या युवा महोत्सवाच्या आयोजनाच्या बाबतीत कोणतेही सहकार्य न करण्याचा निर्णय महासंघाच्या ‘सोलापूर सूटा’ व ‘कोल्हापूर सूटा’ या घटक संघटनांनी जाहीर केलेला आहे. त्या निर्णयाला महासंघाचे कार्यकारी मंडळ आपली सहमती व्यक्त करीत आहे आणि त्याची जाणीव शासनाला करून देण्यात येत आहे. याबाबतीत तातडीने निर्णय झाला नाही तर हा संताप निरनिराळ्या विभागात वेगाने पसरत जाईल व त्याचे जे परिणाम दिसून येतील त्याची संपूर्ण जबाबदारी ही शासनाची असेल.

**२६.** प्रत्येक घटक संघटनेचे पदाधिकारी आपापल्या विद्यापीठाच्या मा. कुलगुरूंना निवेदन देतील व त्यांनी पुढील बाबींचा खुलासा करावा अशी त्यांना विनंती करतील.

(१) २५ सप्टेंबर २०१८ रोजी बोलाविण्यात आलेल्या विशेष समितीच्या बैठकीत कुलगुरूंना बोलाविण्यात आले होते त्या समितीची कामकाज पत्रिका व कागदपत्रे आपणास कोणत्या तारखेला पाठविण्यात आलेली होती?

(२) **विशेष समिती** ही मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे गठीत करण्यात आलेली आहे असेही त्या निमंत्रणामध्ये नमूद करण्यात आलेले आहे हे वस्तुस्थितीवर आधारित आहे किंवा कसे?

(३) मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये अशा प्रकारची विशेष समिती गठीत करण्याच्या बाबतीत कोणतेही आदेश नाहीत ही गोष्ट आपण शासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे काय?

(४) **बैठक विशेष समितीची** बोलाविण्यात आलेली असली तरी **इतिवृत्त मात्र तक्रार निवारण समितीच्या** नावाने काढण्यात आलेले आहे या कृतीचे सभाशास्त्रात काय स्थान आहे?

(५) या बैठकीसमोर कोणकोणते विषय चर्चेसाठी आहे, कोणकोण अर्जदार व गैरअर्जदार आहे, कोणकोणती निवदने देण्यात आलेली आहे याबाबतची कोणतीही माहिती तुम्हाला पुरविण्यात आलेली नव्हती हे म्हणणे वस्तुस्थितीवर आधारित आहे किंवा कसे?

(६) विद्यापीठे व महाविद्यालयातील जागा वर्षानुवर्षे रिकाम्या ठेवण्याच्या प्रकरणामध्ये मा. कुलगुरू न्यायनिवाडा करणार असतील तर याबाबतचे त्यांचे मत ते जाहीरपणे का व्यक्त करीत नाहीत? तशी काही टिप्पणी त्यांनी समितीच्या इतिवृत्तात समाविष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे काय?

(७) समवर्ती सूचीतील विषयावर केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीने विद्यापीठ अनुदान आयोगाने जे रेग्युलेशन्स २०१८ मध्ये भारत शासन राजपत्रामध्ये प्रसिद्ध केले त्याची अवहेलना करण्यामुळे महाराष्ट्रातील उच्च शिक्षणावर कोणते संकट येणार याचा विचार मा. कुलगुरूंनी मा. शिक्षणमंत्र्यांच्या समोर मांडला काय?

(८) या रेग्युलेशन्स प्रमाणे तुम्ही तुमचे स्टॅट्युट्स, ऑर्डिनन्सेस, रूल्स व रेग्युलेशन्स केंद्राच्या रेग्युलेशन्सशी सुसंगत होतील अशा पद्धतीने बदलावे असे आदेश केंद्र शासनाने दिलेले असतांना कुलगुरू किती दिवस हाताची घडी घालून बसू शकतील. याबाबतचे वेळापत्रक काय?

*(९) विद्यापीठांचे मा. कुलगुरू ज्या समितीच्या बैठकीला उपस्थित आहेत त्या बैठकीचे इतिवृत्त समितीने संमत केलेले नसतांना मा.कुलगुरूंना गृहित धरून उच्च शिक्षण विभागाने निर्गमित करणे हे कितपत प्रतिष्ठितपणाचे आहे?*

**२७. कार्यकारी मंडळाचे निर्णय**

(१) मा. उच्च शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक २५ सप्टेंबर २०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त विचारात घेण्यात आले.

(२) कार्यकारी मंडळाच्या आज शनिवार, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रतिनिधी मंडळाने सादर केलेला अहवाल विचारात घेण्यात आला व संमत करण्यात आला.

(३) भारताच्या घटनेतील तरतुदींची अंमलबजावणी करण्याचे प्रश्न, मा. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे प्रश्न या आंदोलनामध्ये निर्णयार्थ आहेत. एकाही बाबतीत अंतिम निर्णय या इतिवृत्तात नमूद नाही.

(४) संघर्षामध्ये अंतर्भूत असलेल्या विषयांच्या बाबतीत शासनाची भूमिका जाणून घेण्याचा सर्व नागरिकांना, उच्च शिक्षण क्षेत्राला, प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना अधिकार आहे याची जाणीव करून देण्यात येत असून एकाही मुद्यावरील एकाही युक्तीवादाला उत्तर देण्याचे मा. शिक्षणमंत्री टाळत आहेत ही गोष्ट नमूद करण्यात येत आहे.

(५) **प्रतिनिधी मंडळाच्या अहवालाच्या परिच्छेद २३ मध्ये व्यक्त करण्यात आलेल्या** “संपूर्ण इतिवृत्ताचे काळजीपूर्वक वाचन केल्यानंतर प्रतिनिधी मंडळाने एकाही प्रश्नाच्या बाबतीत अंतिम निर्णय घेण्याचा मला अधिकार नाही ही गोष्ट मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी लिखित स्वरूपात मान्य केलेली असल्यामुळे आंदोलन ठामपणे सुरू राहील असा निर्णय घेतला. मा. मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपाशिवाय परिस्थितीतून मार्ग निघणे अशक्य आहे असाही निर्णय त्यादिवशीच्या बैठकीमध्ये घेतला.” **या मताशी हे कार्यकारी मंडळ ठाम सहमती व्यक्त करीत आहे.**

(६) शुक्रवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०१८ रोजी दुपारी ३ वाजता आपापल्या विद्यापीठांच्या मुख्यालयांवर घटक संघटनांतर्फे मोर्चाचे आयोजन केले जाईल. मा. कुलगुरूंना निवेदन देण्यात येईल व परिच्छेद क्रमांक २६ मधील मुद्यांबाबत त्यांची काय भूमिका आहे? याबाबत मा. कुलगुरूंशी चर्चा करण्यात येईल व याबाबतच्या माहितीची मागणी करण्यात येईल. *याबाबत लेखी माहिती उपलब्ध न झाल्यास आपापल्या विद्यापीठांच्या मा. कुलगुरूंकडे माहितीच्या अधिकारात त्या मुद्यांची माहिती मागितली जाईल.*

**(डॉ. तापती मुखोपाध्याय)** — *अध्यक्ष*

**(डॉ. एस. पी. लवांदे)** — *सचिव*

MAHARASHTRA FEDERATION OF UNIVERSITY
& COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS
(MFUCTO)

## २६.०९.२०१८ रोजीच्या पत्रान्वये उच्च शिक्षण विभागाकडून पाठविण्यात आलेले दिनांक २५.०९.२०१८ रोजीच्या बैठकीचे मूळ इतिवृत्त व दिनांक ८ ऑक्टोबर २०१८ पत्रान्वये त्याच विभागाने पाठविलेले सुधारित इतिवृत्त
## (तुलनात्मक माहिती)

### (१)
### प्राध्यापक भरती वरील बंदी उठवून भरती प्रक्रिया सुरू करावी.

**मूळ इतिवृत्त**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय एकाकी पदांवरील तसेच काही शिक्षकेतर तांत्रिक पदांवरील बंदी १०० टक्के आणि अधिव्याख्यात्यांच्या रिक्त पदांवरील बंदी काही प्रमाणात उठविण्याबाबतची कार्यवाही सुरू असून, या संदर्भातील शासन निर्णय लवकरच निर्गमित होईल.

**सुधारित इतिवृत्त**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- प्राध्यापक भरतीवरील बंदी उठविण्याबाबत शासनाच्या उच्चाधिकार समितीनेही सहमती दिली असून याबाबत शिक्षकेत्तरची १०० टक्के पदे भरण्यास परवानगी दिली असून शिक्षकीय संवर्गाची ६० टक्के पदे भरायाला उच्च शिक्षण विभाग परवानगी मागत असून उरलेली ४० टक्के पदे तासिका तत्वावर भरण्यास तूर्त अनुमती मिळावी, ही तासिका तत्वावरील पदे भरतांना प्रत्येक अध्यापकास किमान १५ ते २० हजार मिळतील असे मानधन ठरविण्यात यावे. पुढील काळात ही पदे भरण्यात यावीत.

### (२)
### ७१ दिवसांच्या संप काळातील थकीत वेतन मिळावे.

**मूळ इतिवृत्त**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- विभागाने यासंदर्भात वस्तुस्थितीदर्शक प्रस्ताव तयार करून वित्त विभागाकडे सादर करण्याची कार्यवाही करावी.

**सुधारित इतिवृत्त**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- ७१ दिवसांच्या संप काळातील थकीत वेतनाबाबत वस्तुस्थिती दर्शक प्रस्ताव याचा अर्थ अध्यापकांनी परिक्षा काळातील काम हे उशीरा का होईना पण पूर्ण केले असून त्याला मा.सर्वोच्च न्यायालयाचे No work no pay हे निर्देश लागू होत नाहीत. तरी याबाबत विभागाकडून वित्त विभागाला परत गेलेली रक्कम विभागाला परत मिळावी जेणेकरून ७१ दिवसांच्या संप काळातील थकीत वेतन अध्यापकांना देण्यात येईल.

### (३)
### सातवा वेतन आयोग लागू करावा.

**मूळ इतिवृत्त**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- राज्यशासकीय कर्मचारी यांच्यासोबतच विद्यापीठे व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांना सातवा वेतन आयोग लागू होईल.

**सुधारित इतिवृत्त**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- राज्यशासकीय कर्मचाऱ्यांसोबतच विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यात येईल. ७ व्या वेतन आयोगाअंतर्गत केंद्र सरकार जी ५०% थकबाकी देणार असेल तर त्यासाठी उच्च शिक्षण विभागामार्फत विशेष कक्ष उभारून जानेवारी, २०१९ पूर्वी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून केंद्रशासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल जेणेकरून त्यांच्याकडून आलेली थकबाकी प्राध्यापकांना अदा केली जाईल.

### (४)
### विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील सेवकांसाठी वेतन व्यवस्था निर्माण करावी.

**मूळ इतिवृत्त**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- याबाबत तपासणी करून विभागाने त्यावर योग्य ती कार्यवाही करावी. शुल्क नियंत्रण समितीद्वारा रचना उभी करावी.

**सुधारित इतिवृत्त**

**मा. मंत्री यांचे निर्देश** :- याबाबत तपासणी करून विभागाने त्यावर योग्य ती कार्यवाही करावी. शुल्क नियंत्रण समितीद्वारा रचना उभी करावी, सदर रचना अशी असावी की, ज्यात संस्थेने प्राध्यापकांना ऑनलाईन वेतन दिले असल्याचे शुल्क नियंत्रण समितीला खात्री होऊ शकेल व त्या आधारे शुल्क नियंत्रण समिती त्या त्या महाविद्यालयातील शुल्क ठरवेल.

### (५) समारोपीय परिच्छेद

**मूळ इतिवृत्त**

वरीलप्रमाणे मा. मंत्री महोदयांनी निर्देश दिले व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही ही बाब विचारात घेऊन शिक्षक संघटनांनी पुकारलेला संप मागे घेण्याबाबत आवाहन केले.

**सुधारित इतिवृत्त**

वरील बाबींची स्पष्टता पाहता शिक्षक संघटनांचे समाधान होईल. विद्यार्थी हित लक्षात घेता शिक्षकांनी संप मागे घेण्याबाबत मा. मंत्री महोदयांनी शासनातर्फे आवाहन केले. लोकशाही मध्ये आंदोलन करण्याचा अधिकार आहे, पण विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून योग्य निर्णय घेतल्यास शासनही प्राध्यापकांचे नुकसान होऊ देणार नाही असे मा. मंत्री महोदयांनी शिक्षक संघटनांना आश्वासित केले.

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Prin. S. T. Sangle, Bajoriya Nagar, Yavatmal 445 001. Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/078/2018-20 (Uploaded on www.nuta.in on 12.10.2018) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 17.10.2018**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

-----------------------------------------------

To,.......................................................................

.......................................................................

.......................................................................

.......................................................................